www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 179 | शनिवार दि. 15 मार्च २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर बर्निंग कारचा थरार ; कारचा कोळसा,जीवितहानी टळली

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सुकेळी गावाजवळ बुधवार 12 मार्च रोजी रात्री 08.00 वाजण्याच्या सुमारास बर्निंग कारचा थरार पहावयास मिळाला. होळी सणानिमित्त कोकणात जाणाऱ्या चालत्या कारने अचानक पेट घेतल्याने संपूर्ण कारचा कोळसा झाला असून नशीब बलवत्तर म्हणून कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. होळीला कोकणात अती महत्त्व असून या सणासाठी चाकरमानी दरवर्षी मोठ्या प्रमाणात जात असतात. यावर्षी होळी गुरुवार 13 मार्च रोजी असल्याने होळी सणानिमित्त शुभम संतोष तेली रा.पनवेल व रोहीत तेली रा. कल्याण यांच्यासह देविदास अनंत डोंगरे रा. अंधेरी हे आपल्या ताब्यातील वॅगनार कार क्रं. MH 46 BZ 8819 चालवीत मुंबई गोवा महामार्गावरून आपल्या कणकवली गावी जात होते.त्यांची कार नागोठणेच्या पुढे सुकेळी येथील जिंदाल रुग्णालयासमोर आली असता त्याच दरम्यान गाडीतील सर्व सिस्टीमचे इंडीकेटर दाखवत असल्याने डोंगरे यांनी गाडी थांबवून सर्व बाहेर आले असता गाडीचे बोनेट मधुन धुर येवुन गाडीने अचानक पेट घेतला त्यात सदरील संपुर्ण गाडीचा जळुन कोळसा झाला. सर्व वेळीच बाहेर आल्याने जीवितहानी टळली असली तरीही गाडीत ठेवलेले फिर्यादी डोंगरे यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, सारस्वत को.ऑप.बँक व सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे डेबीट कार्ड व वोटींग कार्ड जळाले असून गाडीचे साधारण चार लखचे नुकसान झाले॰ या अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात झाली असून पुढील तपास सहा. पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार गणेश भोईर करीत आहेत.



## चुकीचा संदेश पंतप्रधान देत असल्याचे स्टेट्स ठेवणार्यावर गुन्हा; तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर अंगलट

**नवी मुंबई:** पंतप्रधान नरेंद्र मोदी संदेश द्वारे चुकीचे आणि दोन समाजात तेढ निर्माण करणारे विधान करत असल्याची बनावट चित्रफीत मोबाईल वर स्टेटस ठेवणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात बुधवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल मधील घोट कॅम्प तळोजा येथे राहणारा मुख्तार नूरमहंमद सैय्यद याने मोबाईल वर पंत प्रधान नरेंद्र मोदी हे संदेश देत असल्याचे स्टेटस ठेवले होते. मात्र या स्टेट्स मध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून मूळ संदेश



सोडून दुसराच संदेश दिल्याचे दिसून आले. पंतप्रधान मोदी यांच्या तोंडी चुकीची धार्मिक विधाने , भारतातील हिंदू धर्मीय लोकांच्या हिंदी समाजाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा तसेच दोन समाजात तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने हि चित्रफीत स्टेटस वर ठेवण्यात आला. हि बाब सीबीडी पोलिसांच्या निदर्शनास आल्यावर सय्यद याला चौकशी साठी बोलावण्यात आले. मात्र त्याने चौकशी पूर्वीच ती चित्रफीत स्टेटस वरून काढून टाकली तसेच मोबाईल मधून डिलीट केली. त्यामुळे पोलिसांनी पंतप्रधान यांची बनावट चित्रफीत समाज माध्यमातून प्रसारित करणे, ज्या मुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल, तसेच पुरावा नष्ट करणे कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त मुलींचा लाटी काठी मर्दानगी खेळ

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

शिव आधार सामाजिक सेवा संस्था सेक्टर 11 संचालित शांतीदूत मर्दानी आखाडा खारघर जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिनांक 8मार्च 2025 रोजी हिंडाल्को इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि. तळोजा या कंपनी ने महिला आणि मुलींसाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये महिला आणि मुलींसाठी हक्क आणि समानता याविषयी व्याख्यान ठेवले होते तसेच सायबर क्राईम विषयी जनजागृती, महिला सुरक्षा या विषयावर श्रीमती दिपाली पाटील मॅडम (पोलिस निरीक्षक सायबर सेल सर्कल 2 पनवेल) आणि कायदे याविषयी माहिती देण्यात आली यासाठी **पान २ वर**



## पाईट येथे बॉश इंडिया फाउंडेशन व दरेकर सोशल फाउंडेशन यांचा वतीने मोफत किसान कार्ड नोंदणी अभियान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे**

पाईट आणि परिसरातील गावातील शेतकऱ्यांसाठी बॉश इंडिया फाउंडेशन, दरेकर सोशल फाउंडेशन, मंडल अधिकारी पाईट व ग्रामपंचायत पाईट यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी बांधवांसाठी दिनांक 11 ते 13 मार्च 2025 या तीन दिवसांसाठी मोफत किसान कार्ड नोंदणी अभियान ग्रामपंचायत कार्यालय पाईट या ठिकाणी घेण्यात आले. यामध्ये पाईट, रौंधळवाडी,आहिरे, तोरणे, परळे, हेद्रुज, बच्चेवाडी, अनावळे, पाळू, कासारी, सुपे, आडगाव, धामणे, कुरकुंडी, आसखेड, तोरणे बुद्रुक, टेकवडी, वाघू. या गावातील 700 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदवला व 500 पेक्षा जास्त लोकांनी प्रत्यक्ष लाभ घेतला सदर कॅम्प पूर्णतः मोफत असल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. किसान कार्डची नोंदणी केल्यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे तसेच शेतकऱ्यांची डिजिटल ओळख निर्माण होणार आहे. त्यामुळे भविष्यात कोणत्याही शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाहीत सदर कॅम्पचे आयोजन बॉश इंडिया फाउंडेशनचे सीएसआरचे प्रतिनिधी रोहित बलुरे, राष्ट्रवादी युवक चे अध्यक्ष जयसिंग दरेकर, पाईट मंडल अधिकारी मनिषा सुतार , ग्रामविकास अधिकारी अनिल फुलपगार यांनी केले. यावेळी उपस्थित तिरुपती गवळी पतसंस्थेचे अध्यक्ष हिरामण रौंधळ, मा.चेअरमन पंडित रौंधळ, मा. उपसरपंच गुलाब खेंगले, युवक संघटक युवराज बंदावने, चेअरमन विजय करंडे, मा.सरपंच मंगल भांगे,कारभारी बबन खेंगले, कृषी सहाय्यक अमृता मॅडम, ग्राममहसूल अधिकारी श्री. माणिक क्षीसागर, कसबे मॅडम, जगताप साहेब, निलेश मांजरे, बाळासाहेब पापळ, संचालक नंदूशेठ डांगले. आदी मान्यवर उपस्थित होते.



## कलादिग्दर्शक विशाल सावंत यांची दादासाहेब फाळके चित्रपट युनियन कोकण अध्यक्षपदी निवड

**मुकुंद कांबळे**
**सहसंपादक**

चित्रपट सृष्टीतील कलाकारांच्या व्यथा व समस्या यांचे व्यथा मांडणारे एकमेव कला दिग्दर्शक विशाल सावंत यांना आता अजून एक जबाबदारी मिळाली आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियन यांनी विशाल सावंत यांची कोकण अध्यक्ष पदी निवड केली आहे. या पदनियुक्तीमुळे कोकण विभागातील ठाणे मुंबई रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग या सर्व



जिल्ह्यात कलावंतांसाठी पर्वणीचे दिवस येणार आहेत. चित्रपट क्षेत्रातील कलावंत आणि तंत्रज्ञान हक्कासाठी एकमेव व्यासपीठ दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही आता मोठ्या जोमाने उभी राहणार आहे. त्याचबरोबर चित्रपट आणि मालिका या क्षेत्रात काम करणारे कलावंत तंत्रज्ञान यांच्या समस्या सरकार दरबारी मांडण्यासाठी विशाल सावंत यांची नियुक्ती केली आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियन केवळ चित्रपट नाही तर मालिका क्षेत्रातील कलावंतासाठी व तंत्रज्ञान व्यक्तीसाठी काम करत आहे. दादा साहेब फाळके चित्रपट युनियन ही कलावंताचं न्याय हकलासाठी चित्रपट आणि मालिका क्षेत्रात कार्यकरीत आहे. प्रत्येक क्षेत्रातील कलावंतानी या दादासाहेब फाळके चित्रपट युनियन मध्ये सहभागी होण्यासाठी किंवा सभासद होण्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. चित्रपट असो या मालिका प्रत्येक तंत्रज्ञ आणि कलावंत यांनी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे सभासद व्हावे अशी विनंती विशाल सावंत यांनी केली आहे.

> विशाल सावंत यांची नियुक्ती म्हणजे दादा साहेब फाळके चित्रपट युनियन यांच्या मार्फत कलाकारांना योग्य तो न्याय व समस्या सोडवण्याचा उत्तम उपाय होय दादासाहेब फाळके चित्रपट युनियन वाढवण्यासाठी त्यांचा अनुभव आणि कार्यप्रणाली यांचा संगम होईल ही अपेक्षा व्यक्त करतो
>
> **अजित म्हामुणकर**
> **( अध्यक्ष दादा साहेब फाळके चित्रपट युनियन)**

## उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कारप्राप्त पोलिसांचा सत्कार...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूर अनंतपाळ :** येथील पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर अनंतपाळ पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक गजानन अन्सापुरे,साकोळ बीटचे जमादार गोविंद मलवाड व कॉन्स्टेबल कैलास शिंदे यांनी शिरूर अनंतपाळ पोलिस स्टेशन हद्दीत घडलेल्या अनेक गुन्ह्यांमध्ये केलेला तपास करून आरोपी जेरबंद करणे,आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक नागरिकांशी सुसंवाद कायम करणे तसेच शांतता अबाधित ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे या सर्व गोष्टींची दखल घेऊन नुकतेच लातूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते या पोलिस अधिकारी यांचा उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले होते. अशा कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी यांचा शिरूर अनंतपाळ पोलिस स्टेशन येथे पोलिस मित्र सोमेश्वर तोंडारे, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या वेळी बालाजी बरबटले, संभाजी पारशट्टे, प्रभाकर धुमाळे उपस्थित होते.



## तळोजा फेज 3 येथील पाणी पुरवठा समस्येवरुन शिवसेना आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** तळोजा फेज 3 येथील रहिवाशांना गेल्या अनेक दिवसापासून सिडकोकडून करण्यात येणारा पाणी पुरवठा कमी दाबाने व कमी प्रमाणात करण्यात येत असल्याने याविरोधात आता शिवसेना आक्रमक झाली आहे. तळोजा फेस 3 मध्ये पाणीपुरवठा खूपच कमी प्रमाणात होत आहे त्या अनुषंगाने पनवेलचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनानुसार आज सिडकोचे अधीक्षक अभियंता ( पाणीपुरवठा विभाग ) यांना निवेदन दिले आणि रहिवाश्यांच्या समस्या मांडल्या. यावेळी उपशाखाप्रमुख उद्धव मातने, शिवदूत नामदेव कोळेकर आणि शिवदूत विक्रम शिरसाट हे सर्व उपस्थित होते. सिडकोचे अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा विभाग) सेवतकर यांनी त्वरित तळोजा सिडको पाणीपुरवठा विभाग चेतन देवरे यांच्याशी फोन द्वारे चर्चा केली आणि तळोजा विभागातील पाणीपुरवठ्याचा समस्या याबद्दल जाब विचारला. तसेच चारही सेक्टरला समप्रमाणात असणाऱ्या प्रेशरने पाण्याचा मुबलक पुरवठा केला जावा यासाठी जलवाहिन्यांचे प्रेशर चेक करून रेग्युलेट करण्यासाठी आदेश दिले.








# जागतिक महिला दिनानिमित्त मुलींचा लाटी काठी मर्दानगी खेळ

**पान १ वरुन** प्रमुख पाहुणे ॲड. सौ संतोषी चव्हाण मॅडम यांनी महिलांचे हक्क, कायदे सक्षमीकरण यावर माहिती दिली. यावेळी *शिव आधार सामाजिक सेवा संस्था सेक्टर 11 संचलित शांतीदूत मर्दानी आखाडा खारघर* यांच्या लाठी काठी प्रशिक्षण वर्गातील मुलींना त्यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी आमंत्रित केले होते. त्यामध्ये मुलींनी स्टेजवर प्रात्यक्षिक दाखवून सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्याच्या बरोबर त्याच्या प्रशिक्षिका सौ अश्विनी घोरपडे मॅडम आणि सौ प्रतीक्षा कदम मॅडम यांनी मोलाचे योगदान दिले त्यांनीही प्रात्यक्षिक सादर केले.. हिंडाल्को कंपनी ने प्रशिक्षका सौ अश्विनी घोरपडे आणि सौ प्रतीक्षा कदम यांचा सत्कार केला.शिव आधार च्या या छोट्या रणरागिणी ना आमंत्रित करून त्याची गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी दिली त्यांचा आत्मविश्वास कर्तृत्व दाखवण्याची संधी दिली व त्यासाठी वाव दिला त्यामुळे मुलींचा आत्मविश्वास द्विगुणित झाला कारण एवढ्या मोठ्या कंपनीत स्टेज परफॉर्मन्स करण्याची त्याची पहिलीच वेळ होती त्यासाठी हिंडाल्को कंपनीचे मनापासून आभार. आणि विशेष करून ॲड सौ संतोषी चव्हाण मॅडम यांचे आभार त्याच्यामुळे शांतीदूत मर्दानी आखाडा मधील मुलींना महिला दिना निमित्त आपले कर्तृत्व दाखवण्याची संधी मिळाली. या मध्ये ईश्वरी घोरपडे, कुंजिका अहिरे, शुभ्र शिरसकर, मनस्वी करपे, जिविका अहिरे, ईश्वरी शेडगे, तनिष्का पानमंद, कावेरी झगडे, अर्णव मोरे आणि ईशान (शंभू) घोरपडे सर,शर्वरी निंबाळकर, शुभ्रा शिर्सेकर या सर्व रणरागिणी आणि बाल मावळे यांनी उत्कृष्ट पद्धतीने शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक सादर केले.



दैनिक युवक आधार – मोहोपाडा वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सदस्या प्रशाली एकनाथ खाने यांच्या निवासस्थानी धुलीवंदन कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित असलेले खाणे आंबिवली येथील ग्रामस्थ

# वरुर येथे सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण



**अमरापुर :** ग्रामविकास योजनेअंतर्गत भारत फोर्ज लिमिटेड ,पुणे या कंपनीच्या अर्थ व तंत्र सहाय्याने सार्वजनिक पाणीपुरवठा जलशुद्धीकरण यंत्रासाठी एक व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरूर बुद्रुक, खुर्द करिता प्रत्येकी दोन असे एकूण तीन सौर ऊर्जा पॅनल उपलब्ध करून देण्यात आले. या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा नुकताच संपन्न झाला .भारत फोर्स कंपनीच्या सीएसआर विभाग प्रमुख लीना देशपांडे ,अधिकारी जयदीप लाड, जलदूत उमेश भालसिंग, सरपंच सचिन म्हस्के ग्रामपंचायत आजी माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सोलर पॅनलचे लोकार्पण करण्यात आले . आधुनिक युगामध्ये वाढती लोकसंख्या व प्रदूषणाची समस्या लक्षात घेता पर्यावरण पूरक संसाधनांचा वापर करणे काळाची गरज आहे. त्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प राबवण्याबाबत संस्थेमार्फत जनजागृती केली जात आहे. गावातील ग्रामस्थ व सामाजिक संघटनांच्या पुढाकारातून भारत फोर्ज कंपनी मार्फत वेगवेगळे समाजाभिमुख उपक्रम राबवले जातात असे प्रतिपादन डॉक्टर लीना देशपांडे यांनी केले. यावेळी कुंडलिक महाराज लव्हाट, पूजा ढोले, सुधीर म्हस्के ,गणेश मोरे ,उमेश भालसिंग यांनी मनोगत व्यक्त केले प्रास्ताविक सरपंच सचिन म्हस्के तर सूत्रसंचालन गणेश म्हस्के यांनी केले.

# मानव सेवा प्रकल्पाला सरपंच पुंड यांच्याकडून धान्य

**अहिल्यानगर:**अरणगावचे सरपंच पोपटराव पुंड यांच्या वतीने मनोरुग्णांसाठी काम करणाऱ्या मानव सेवा प्रकल्पाला दहा पोती धान्य राणीताई लंके यांच्या हस्ते देण्यात आले.राणीताई लंके यावेळेस बोलताना म्हणाले की, खासदार यांचा वसा त्यांचे कार्यकर्ते पुढे चालवत आहेत.त्यातूनच आज अरणगावचे सरपंच पुंड यांनी मनोरुग्णांना दहा पोती धान्य भेट दिली आहे.हे कार्य खरंच उत्कृष्ट आहे.दरवर्षी ते वाढदिवसानिमित्त असा उपक्रम राबवत असतात. इथून पुढे त्यांनी दरवर्षी साहेबांचा वाढदिवसानिमित्त मानव सेवा प्रकल्प मदत करत जावी असे त्या म्हणाल्या. सरपंच पुंड म्हणले गोरगरिबांच्या असलेले खासदार निलेश लंके यांना अभिप्रेत असलेले काम आम्ही करत आहोत.या मानवसेवा प्रकल्पात ७४ स्त्री-पुरुष मनोरुग्ण राहत आहेत.

त्यांना अन्न, वस्त्र, निवारा देऊन त्यांच्या वर उपचार केले जातात व हे सर्व लोक सहभागातून केले जाते.म्हणून आम्ही या ठिकाणी आज साहेबांचा वाढदिवस इतर सर्व खर्च टाळून या ठिकाणी धान्य भेट दिलेला आहे व पुढेही गोरगरिबांना सहकार्य करण्याचं काम मी व माझे सर्व सहकारी करत राहणार आहे. संस्थेची माहिती ऋतिक बर्डे यांनी दिली ते म्हणाले महाराष्ट्रातून येथे पोलिसांच्या मदतीने मनोरुग्णांना दाखल केले जाते.त्यांच्या वर योग्य ते उपचार करून त्यांचे पुनर्वसन करून त्यांच्या कुटुंबांना शोधून त्यांच्या ताब्यात दिले जाते.लवकरच येथे बिल्डिंगचे कामही पूर्ण होत आहे.पुण्यातील एक दानशूर ही बिल्डिंग बांधून देत आहे.आमचे सर्व कार्य हे लोकाआश्रया वरती चालते.त्यामुळे अनेक दानशूर लोक येथे मदत करत असतात असे बोलून त्यांनी खा.लंके यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# स्त्री शक्तीचा जागर करुन निमगाव वाघात पेटवली होळी



**नगर -** निमगाव वाघा (ता.नगर) येथे एकता फाऊंडेशनच्या वतीने स्त्री शक्तीचा जागर करुन होळी पेटविण्यात आली. महिलांवर होणाऱ्या अत्याचार प्रवृत्तीचे दहण करण्यात आले. गावातील महिलांना होळी पेटविण्याचा मान देऊन मोठ्या उत्साहात विधीवत पूजेने होळी सण साजरा करण्यात आला. रंजना दुश्मन, मंगल फलके, द्वारकाबाई येणारे, अनिता शिंदे, रूपाली फलके, शैला फलके, मंदा पाचरणे या महिलांच्या हस्ते होळी पेटविण्यात आली. याप्रसंगी उपसरपंच किरण जाधव, एकता फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सोसायटी सदस्य अतुल फलके, अरुण अंधारे, अजित फलके, विजय गायकवाड, बाबा काळे, गौरव काळे, रामदास फळके, उपेंद्र घाटविसावे, अंतवन गायकवाड आदी उपस्थित होते. उपसरपंच किरण जाधव म्हणाले की, महिला या समाजाचा व कुटुंबाचा कणा आहे. त्यांचा सन्मान करुन एकता फाऊंडेशनने घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. अतुल फलके यांनी या होळीत महिलांवर होणारे अत्याचार प्रवृत्तीची होळी करुन महिलांना देवीच्या रुपाने पुजण्याचा प्रत्येकाने संकल्प करण्याचे आवाहन केले.

# पाणी वापर संस्थेचा अनधिकृत पाणी उपसा बंद करा

## शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**नगर -** औटेवाडी ता. श्रीगोंदा येथील तलावावरील पाणी वापर संस्थेच्या संचालक मंडळाच्या आर्थिक तडजोडीने चाललेला अनधिकृत पाणी उपसा बंद करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे. यावेळी राजेंद्र संपत औटी समवेत धनंजय औटी, निवृत्ती खेतमाळीस, दिलीप औटी, बबन औटी आदी शेतकरी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, औटेवाडी तलावात पाणी वापर संस्था अस्तित्वात आहे. पाणी वाटप संस्थेचे अधिकृत सभासद ८० ते ९० असून तलावात प्रत्यक्षात १७० ते १८० मोटरी लावून चालू आहे. हे अनधिकृत बाकीचे मोटारी कोणाचे आहे. या अनधिकृत मोटारी लावलेल्या




व्यक्तींकडून पाणी वापर संस्थेच्या संचालक मंडळाच्या आर्थिक तडजोडी मोठ्या प्रमाणात चालू असुन पाणी वापर संस्थेचे संचालक मंडळ बेकायदा अनाधिकृत लोकांना आर्थिक तडजोड करून मोटारी बसवण्यास मदत करत असल्यामुळे सदर ठिकाणी पाणी वापर संस्थेचे अधिकृत सभासदांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे व सदर ठिकाणी संचालक मंडळाच्या वरद हस्ताने पाणी वाटप संस्थेचे अधिकृत सभासद नसताना अनाधिकृत मोटारीने बेकायदा पाणी उपसा करत आहे. तरी सदर अनधिकृत मोटारींना तलावावर पाणी वाटप संस्थेचे सभासद नसताना वीज कनेक्शन कसे काय देण्यात आले याबाबत तातडीने चौकशी करून बेकायदापणे पाणी उपसा करणाऱ्या मोटारीचे वीज कनेक्शन बंद करून बेकायदा पाणी उपसा करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

# लाडकी बहिण योजनेबाबत फसवणूक करणाऱ्या शासना विरोधात उरण शिवसेनेचे कार्यकर्ते आक्रमक.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माजी लाडकी बहिणी योजना ही महाराष्ट्र राज्य शासनाने जुलै २०२४ मध्ये महिलांसाठी सुरू केलेली एक योजना आहे महाराष्ट्र राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे, आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी लाडकी बहीण योजना सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी मान्यता दिली होती. या अनुषंगाने गुरुवार दिनांक १५मार्च २०२५ रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उरणतर्फे तहसीलदार उद्धव कदम यांना भाजपा शिंदे अजित पवार यांच्या महायुती सरकार विरोधात निवेदन देण्यात आले. २०२४ च्या निवडणुकीत लाडकी बहीण योजनेच्या १५००/- ऐवजी २१००/- रुपये देण्याच्या आश्वासनाची पूर्तता करत नसल्याने धोकेबाज महायुती सरकारचा निषेध करण्यात



आला. खोटी आश्वासने देऊन महिलांची फसवणूक करणाऱ्या सरकारच्या विरोधात आक्रमकपणे आंदोलन करण्याचा इशारा उपस्थितांनी दिला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर शेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, तालुका संघटक बी एन डाकी, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, तालुका संपर्कप्रमुख दीपक भोईर, शहर प्रमुख विनोद म्हात्रे, तालुका उपसंघटक रुपेश पाटील, माजी शहरप्रमुख महेंद्र पाटील, माजी उपनगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, माजी उपसभापती हिराजी घरत ,उपजिल्हा संघटिका ममता पाटील, उरण शहर संघटिका सुजाता गायकवाड ,जिल्हा निहाय वक्त्या मनीषा ठाकूर ,महिला विधानसभा संघटिका ज्योती म्हात्रे, वशेणी सरपंच अनामिका म्हात्रे ,कविता पाटील, शाखा संघटिका लता राठोड, सोशल मीडिया समन्वयक नितीन ठाकूर, विभाग प्रमुख नारायण तांडेल ,राजन कडू वैभव करंगुटकर ,माजी शाखाप्रमुख पागोटे रमेश पाटील, हितेंद्र म्हात्रे, डोंगरी शाखाप्रमुख सचिन पाटील, आदींसह महिला पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीअप्पासाहेब निकत (IFS Officer ) यांना वन सेवेतील वन संरक्षणाच्या प्रभावी व सर्वोत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे राज्यस्तरीय सुवर्ण पदक जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

करमाळा जिल्हा सोलापूर येथील रहिवाशी श्री. अप्पासाहेब निकत (IFS Officer ) यांना वन सेवेतील वन संरक्षणाच्या प्रभावी व सर्वोत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय सुवर्ण पदक ( Gold Medal) दि. ११ मार्चचे शासन निर्णयाद्वारे जाहीर केले आहे.

वन संपतीचे संरक्षण,संवर्धन व वन विस्ताराचे काम प्रभावी पणे करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सर्वोत्तम कार्यासाठी राज्य स्तरावरून पुरस्कार व पदके महाराष्ट्र शासनाकडून दिली जातात.सदर पदक जाहीर करताना शासनाने संबधीत अधिकारी यांचे गोपनीय



अहवाल,सचोटी, चारित्र्य,तांत्रिक कार्यक्षमता,बुद्धिमत्ता व नावीन्यपूर्ण कामाचे स्वरूप पाहून राज्यस्तरीय पदक निवड समितीने वन व संरक्षण,वन व्यवस्थापन,वनविस्तार व नावीन्य पूर्ण कामासाठी श्री. अप्पासाहेब निकत भारतीय वन सेवेतील अधिकारी यांना महाराष्ट्र शासनाने हा पुरस्कार व पदक जाहीर करून गौरवण्यात येणार आहे.श्री. अप्पासाहेब निकत हे रायगड जिल्ह्यात जिल्हा वन अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी ५० लक्ष नवीन वृक्ष लागवड, १ कोटी रोपे निर्मिती, नवीन आधुनिक रोपवाटिका, जैवविविधता वन उद्यान, निसर्ग पर्यटन केंद्र निर्मिती केले. त्याच बरोबर वन प्रचार प्रसिद्धी, वन वणवा रोखणे, समुद्री कासव, गिधाड व दुर्मिळ वन्यप्राणी संरक्षण व संवर्धन यासाठी विशेष प्रयत्न केले. विविध गुन्ह्यामध्ये वन तस्कर व वन्यजीव तस्कर यांना अटक करून वाहनेही जप्त करून शासन जमा केली. रायगड व रोहा संवर्धन क्षेत्राची नवीन निर्मिती केली.तसेच जंगलात मृद व जल संधारणाची कामे मोठया प्रमाणात करून भूगर्भ जल पातळी वाढविणे आणि वन्य प्राण्यासाठी पाणवठे तयार करून जल, जंगल व प्राण्यांचे संवर्धनाचे महत्वपूर्ण कार्य केले. श्री.निकत यांनी "अटल आनंदवन घनवन" हे पुस्तक लिहून वन विस्तारासाठी मोलाचे कार्य केले आहे.या पूर्वीही सन २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाने श्री.अप्पासाहेब निकत यांना राज्यस्तरीय रजत पदक देऊन सन्मान केलेला आहे.तसेच विविध संस्थानी श्री.निकत यांना पुरस्कार देऊन गौरविले आहे. सन मार्च २०२५ मध्ये जाहीर केलेल्या राज्यस्तरीय सुवर्ण पदकासाठी विविध स्तरावरून श्री. अप्पासाहेब निकत यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# रुग्णसेवा हीच जनसेवा मानून केलेले सेवा हे पूर्णत्वास नेते - आमदार प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

मानवता सेवा ही महत्त्वाची आहे. डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाचा आवाका वाढत चालला असून रुग्ण सेवा येथे चांगली मिळत असल्याने मोठ्या प्रमाणात रुग्ण येथे उपचाराकरिता दाखल होत आहेत. डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात असणारे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रम प्रसंगी केले.

पनवेल शहरातील डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात सुसज्ज नेत्र शस्त्रक्रियागृह, वातानुकूलित शवागृह , मॅमोग्राफी मशीन, आयुष उद्यान, केंद्रीय निर्जंतुकीकरण पुरवठा विभाग यांचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत



पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, सार्वजनिक विभाग कार्यकारी अभियंता संजीवनी कट्टी, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर सोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक शाकीर पटेल, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका आरती नवघरे, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेवक डॉक्टर अरुणकुमार भगत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर निशिकांत पाटील, उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अशोक गीते, गौरव कांडपिळे यासह इतर अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, रुग्णसेवा हीच जनसेवा मानून डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर काम करीत असतात आणि रुग्ण त्यातूनच पूर्ण बरे होत असतात ही जनसेवा बरच काही देऊन जाते त्यामुळेच आज उपजिल्हा रुग्णालयाची विश्वासहार्ता लोकांमध्ये वाढत चालली असून मोठ्या प्रमाणात रुग्ण येथे उपचार अर्थ येत असतात व रुग्ण बरे होऊन जातात त्याचाच मोठा आनंद होतो. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर सोमण यांनी सुद्धा त्यांच्या कंपनीच्या सीआर फंडाच्या माध्यमातून दहा लाखाची मोफत औषधे रुग्णांना उपलब्ध करून दिली आहेत. डॉक्टर गिरीश गुणे यांच्या रोटरी क्लबच्या माध्यमातून सुद्धा येथे मदत होते असते. माजी नगरसेवक राजू सोनी यांनी सुद्धा या ठिकाणी आयुश उद्यान स्वखर्चाने उभा करून दिला आहे. या सर्वांनीच सामाजिक भावनेतून केलेले कार्य हे कौतुकास्पद असल्याचं मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. तर याप्रसंगी बोलताना आमदार विक्रांत पाटील यांनी सांगितले कि, शासकीय रुग्णालयातील अपुऱ्या सुविधेमुळे नागरिक खाजगी रुग्णालयाकडे नाईलाजाने वळतात मात्र आता आपले उपजिल्हा रुग्णालयात सर्व सुविधांनी सुसज्ज झाले आहे. त्यामुळे या रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी नागरिकांसोबत संवाद साधून नागरिकांची मानसिकता बदलविण्याची गरज असल्याचे मत आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना माजी महापौर कविता चौतमोल यांनी सांगितले कि, आमदार प्रशांत ठाकूर यांनी पहिल्यापासूनच या उपजिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून रूग्णांना चांगली सेवा देण्यासाठी प्रयत्न केले. कोरोनाकाळात सुद्धा जास्तीत जास्त रुग्ण येथे दाखल झाले होते. व त्यांच्या चांगली सेवा झाली. आज या रुग्णालयाचे अत्याधुनिक रूप साकारले जात आहे यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. तर सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर सोमण यांनी सुद्धा या उपजिल्हा रूग्णालयाचे कौतुक करताना सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला लाजवेल अश्या अत्याधुनिक सोयीसुविधा रुग्णांसाठी उपलब्ध झाल्याचे सांगितले. 25 मृतदेह ठेवण्यासाठी शवागृह, डायलिसिस सेंटर, डोळ्याची तपासणी आदी सेवेचा फायदा गरीब रूग्णांना होणार आहे. विस्टा फूडच्या माध्यमातून नेहमीच रुग्णालयाला मदत करत असतो. यंदाही त्यांच्या सीएसआर फंडातून 10 लाखाची औषध दिल्याचे त्यांनी सांगितले. आता फक्त येथील सर्वच वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे रुग्णसेवा असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभाऊ खरात यांनी केले.

# चिपळे येथील पुलाचे काम 80 टक्के पूर्ण, महिनाभरात पूलाचे काम पूर्ण होणार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील चिपळे येथील नवीन पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुलाचे 80 टक्के काम पूर्ण झालेले असून लवकरच या पुलाचे काम पूर्ण होऊन ते नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे. 1975 मध्ये बांधलेल्या चिपळे येथील पूल धोकादायक झाल्यानंतर नवीन पुलासाठी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. सद्यस्थितीत ग्रामीण भागात लोकवस्ती प्रचंड वाढलेली आहे. विविध भाषिक मोठ्या संख्येने नेरे, विहिघर, उमरोली, वाजे आदी परिसरात राहत आहेत. चिपळे येथील पूल 1975 साली बांधण्यात आला आहे. त्याचे आयुष्यमान पन्नास वर्षे असल्याने व सद्यस्थितीत या पूलाला 49 वर्ष पूर्ण झालेली आहेत. सध्याच्या चिपळे पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी दुसरा पूल होणे गरजेचे होते. पुलाचे दहा कोटी रुपयांचे काम असून टीआयपीएलकडून काम वेगात सुरू आहे. पुलाच्या दोन्ही बाजूला पादचाऱ्यांना जाण्या येण्यासाठी फुटपाथ असणार आहेत.

नवीन होणाऱ्या पुलाच्या बाजूला सिमेंट कॉंक्रेटचा रस्ता देखील बनवण्यात आला आहे. सद्यस्थितीत या पूलाचे 80 टक्के काम पूर्ण झालेले असून पुलावर स्लॅब टाकण्याचे काम सुरु आहे. पूलाला अडथळा येणारी झाडे आणि बस थांबा देखील काही दिवसांपूर्वी तोडण्यात आला. मार्च महिना अखेरपर्यंत या पुलाचे काम पूर्ण होणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.



## पन्नास हजार रुपयांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कॅन्टीन मध्ये काम करत असलेल्या नोकराने 50 हजाराची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विशाल गजघाटे हे कॅन्टीन चालवतात. कॅन्टीनमध्ये रामचंद्र उर्फ संतोष उपाध्याय याला कामाला ठेवले आहे. आठ मार्च रोजी यांनी पन्नास हजार रुपये लॉकर मध्ये ठेवले होते आणि संतोष याच्याकडे कार्यालयात झोपण्यासाठी चावी दिली. नऊ मार्चला ते कार्यालयात आले असता रामचंद्र उर्फ संतोष हा चावी ठेवून निघून गेलेला होता. लॉकर उघडले असता 50 हजार रुपये मिळून आले नाहीत. त्याने चोरी केल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

================

## घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

केवाळे येथील अभिनंदन क्लोरीस सोसायटीत केलेल्या घरफोडीत चोरट्यांनी एक लाख 88 हजार रुपये किमतीचा मुद्देमालाची चोरी केली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत. वाघमारे या घराला लॉक लावून आकुर्ली येथे क्लास घेण्यासाठी गेल्या होत्या. क्लास संपवून घरी आले असता घराचा लॉक तुटलेला अवस्थेत दिसला. आणि घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. त्यांनी पाहणी केली असता रोख रक्कम, सोन्याचे नेकलेस आणि चांदीचे पैंजण चोरीला गेल्याचे दिसून आले.

================

## ट्रेलर वरील चालकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

ट्रेलरवरील ताबा सुटल्याने ट्रेलर वडाच्या झाडाला धडकला आणि ट्रेलरवरील चालक पाटेश्वर रामबेलास याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. 13 मार्च रोजी सकाळी आठच्या सुमारास ट्रेलर क्रमांक एम एच 46 बीबी 1921 वरील चालक पाटेश्वर रामबेलास ( 38, रा. बस्ती उत्तर प्रदेश) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने घेऊन जात होता. कोन, रसायनी सिमेंट रोड देवळोली गावच्या 100 मीटर अगोदर त्याचा ट्रेलरवरील ताबा सुटला आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या वडाच्या झाडाला ठोकर मारून अपघात झाला. या अपघातात ट्रेलर पलटी झाला आणि चालक पाटेश्वर रामबेलास हे गंभीर जखमी होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला.

# कोप्रोली गावात परंपरागत होळी उत्सव आणि धुलीवंदन मोठ्या जल्लोषात साजरा.

**दैनिक युवक आधार**
**रणिता ठाकूर उरण रायगड**

परंपरागत चालत आलेल्या संस्कृतीचे जतन करत कोकणात विविध सणसमारंभ साजरा केले जातात तेही संस्कृतीला धरूनच. त्यातीलच एक आनंदाचा आणि जल्लोषाचा सण म्हणजे होळी सण. या सणाच्या दिवशी अगदी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत आनंद उत्सव साजरा केला जातो. होळीच्या दिवशी होळी नटून सजून उभी केली जाते. त्याच्या शेजारी एक मुलारी म्हणून ही उभा केला जातो. आणि ह्या होळीला पानाफुलांनी सजवून. पुरणपोळीचं नैवेद्यही दिलं जातं. उरण तालुक्यातील कोप्रोली गावची होळीका उत्सव ही मोठ्या जल्लोषात याच प्रमाणे साजरा केला जातो. यंदाही होळी आणि धुलीवंदन तितक्याच उत्साहाने साजरा करण्यात आला. आज कालच्या वाढत्या तंत्रज्ञानाच्या आणि



प्रगतीच्या झोतात जरी कोप्रोली गाव असले तरीही पूर्वापार चालत असलेली संस्कृती विसरलेले नाहीत. येथील गावकरी गुण्यागोविंदाने एकत्र होळी साजरी करत असतात. या गावात दोन ठिकाणी होळी लावली जाते गणेश मंदिरा समोर आणि बागण बाई कोळीवाड्या जवळ. या दोन्हीही होळीच्या उत्सवासाठी पाटील नेमले जातात त्यामध्ये गणेश मंदिराजवळ निळकंठ म्हात्रे आणि बागण बाई कोळीवाड्या जवळील होळी चे संतोष म्हात्रे हे या वर्षीचे पाटील होते. त्यांनी या होळीच्या पूजनाची व्यवस्था केली होती. त्याचबरोबर संध्याकाळी सात वाजल्यापासून होळी पूजनाला सुरुवात करण्यात आली. आणि रात्रीच्या बारा वाजता "हा हा हावली शी शी शिमगा" म्हणत होळीचे दहन करण्यात आले. या होळी दहणाच्या वेळी नवीन नवरी नारळ होळीमध्ये अर्पण करण्यासाठी आपल्या नवरदेवा सोबत येत असते ही पूर्वीपासून एक प्रथा आहे. त्याचबरोबर दरवर्षीप्रमाणे होळी समोर मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले जातात. त्याचप्रमाणे यावर्षीही संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या छाव्याचे म्हणजे छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपटाचे "छावा" हा 'श्री बापूजी देव वृक्ष वाटिका ग्रुप' यांनी पडद्यावर प्रदर्शित केले. चित्रपटाची सुरुवात हर हर महादेव या घोषणेन करण्यात आली आणि सांगताही महाराजांना मुजरा करत करण्यात आली. त्याचप्रमाणे दुसऱ्या दिवशीही धुलीवंदन मोठ्या उत्साहात लहानांपासून थोरांपर्यंत साजरा करण्यात आला. यावेळी प्रत्येक जण हसत नाचत खेळत प्रत्येकाच्या दाराजवळ शिमग्याचा खेळ मागायला जातात. आणि लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी या खेळाचा आनंद घेतला. एकंदरीत २०२५ चा होलिका उत्सव आणि धुलीवंदन मोठ्या उत्साहात कोप्रोली गावातील गावकऱ्यांनी साजरा केला.

## मुक्रमाबाद शहर सीसीटीव्ही कॅमेरेच्या नजरेत.सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके यांचा पुढाकाराने

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड - मुखेड तालुक्यातील**





मुक्रमाबाद : पोलीस ठाण्याचा विस्तार व कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यात अडचणीचा सामना करावा लागत होता. पण सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके यांच्या पुढाकारातून व लोकसहभागातून मुक्रमाबाद शहरात सर्वत्र सी.सी.टीव्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मुक्रमाबाद शहराचा वाढता विस्तार पाहता तोकडी संख्या असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांवर येऊन ठेपली होती. त्यामुळे शहरात छोट्या मोठ्या चोऱ्यांचे काहीसे प्रमाण वाढले होते. तर शाळा व महाविद्यालये परिसरात रोड रोड रोमीवोंचा सुळसुळाट वाढल्यामुळे यावर आळा घालण्यासाठी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके, यांनी शहरात सी.सी.टीव्ही. कॅमेरे बसविण्यासाठी होईल तेवढी व्यापारी, राजकीय पुढारी व इतर दानशूर व्यक्ती कडून लोक वर्गणी जमा केली. तसेच कमी पडलेले पैसे स्वतः देऊन शहरातील देगलुर रेणापूर या मुख्य महामार्गावर मुख्य बाजार पेठ, शाळा, महाविद्यालये परिसर, भवानी चौक, यासह इतर १३ ठिकाणी सी.सी.टीव्ही. कॅमेरे बसविले. सी.सी.टीव्ही. मुळे सीमावर्ती भागातून येणाऱ्या व्यक्ती वर तसेच शाळा परिसरात टवाळखोरांवरही नजर राहणार आहे. काही दिवसांत शहरातील सर्वच मंदिर व देवस्थानात सी.सी.टीव्ही. बसविण्यात येणार आहे यामुळे गुन्हेगारीवर मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे.



दैनिक युवक आधार - रायगड जिल्ह्य मध्यवर्ती सह बँकेचे विद्यमान संचालक श्री संतोष हरिभाऊ पाटील पनवेल यांची सातारा जिल्ह्य मध्यवर्ती सह बँकेला सदिच्छा भेट दिली सातारा जिल्ह्य मध्यवर्ती सहकारी बँकेचे सीईओ डॉक्टर सरकाळे यांनी श्री संतोष पाटील यांचे स्वागत केले

## .. सालाबाद प्रमाणे याही वर्षी नळदुर्ग भोई गल्ली येत होळी सण साजरा करण्यात आले..

**दैनिक युवक आधार --**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

देशभरात हिंदू धर्माचा होळी सण जल्लोषामध्ये साजरा होत असताना त्याच अनुषंगाने दि.१३ मार्च रोजी नळदुर्ग शहरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी भोई गल्ली येत हलगीच्या वाद्य वाजवत होळी सण साजरा करण्यात आला यावेळी नळदुर्ग भोई समाजाचे अध्यक्ष सुनील उकंडे सर यांच्या हस्ते होळीची पूजा करून पेटवण्यात आली यावेळी उपाध्यक्ष दीपक डुकरे पिंटू पुदाले तसेच भोई समाजचे सर्व सदस्य महेंद्र डुकरे संतोष पुदाले किरण डुकरे तसेच समाजबांधव व बालगोपाळ उपस्थित होते

## रंगांची उधळण करत धुलीवंदन उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** जीवनात रंग भरणाऱ्या रंगांचा उत्सव म्हणजे धुलीवंदन हा सण साजरा करण्याची भारतीयांची परंपरा आहे. नात्यांचा नवा उजाळा देणारा हा उत्सव शुक्रवारी दि.१४ रोजी पालोद मध्ये एकोप्याने तसेच आनंदाने साजरा करून नैसर्गिक रंगांची उधळण करण्यात आली.सकाळपासूनच तरुण व बालगोपालांनी विविध रंगांची उधळण करत संगीताच्या तालावर थिरकत आनंद साजरा केला.

होळी उत्सवात धुलिवंदनाला विशेष महत्त्व असते. तालुक्यात सर्वत्र आजच्या दिवशी धुलिवंदन साजरे करतात. त्यामुळे बाजारात रंग तसेच पिचकारी खरेदी करण्यासाठी गर्दी पहावयास मिळाली. तरुणाई धुलीवंदनाच्या उत्साहात रंगून गेली होती. विशेषतः महिलांचाही सहभाग खूप मोठा दिसून आला. संगीताच्या तालावर पाण्याच्या वर्षावान युवकांनी ठेका धरला होता. शालेय मुलांनी यावेळी एकत्रित येत धुलीवंदनाचा आनंद लुटला. यावेळी तरुणांची संख्या लक्षणीय होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सिल्लोड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार साहेब यांच्यासह संपूर्ण पोलीस टीमने गावात कडक बंदोबस्त ठेवला होता.



# मनोज सुरेश राऊत अकोला वाशिम जिल्ह्यातून प्रथम व भारतातून 49 वा नंबर प्राप्त करून घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**

भारतातून तीन लाख मुलांनी परीक्षा दिली त्यामध्ये मनोज राऊत यांनी 49 वा नंबर पटकावला व अकोला वाशिम जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उज्वल केले

मालेगाव 15 मार्च

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील हनवतखेडा हे गाव अतिशय दुर्गम भागात असून याच गावातील हरिदास किसनराव राऊत यांचा नातू व सुरेश हरिदास राऊत यांचा मुलगा मनोज यांनी भारतामध्ये तीन लाख विद्यार्थी परीक्षेला बसलेल्या पैकी भारतातून 49 वा नंबर पटकावून अकोला वाशिम जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उज्वल केले व वाशिम अकोला जिल्ह्यामधून प्रथम क्रमांक पटकावून त्यांनी जिद्द चिकाटी प्रामाणिकपणा यांच्या भरवशावर आपलं घवघवीत यश प्राप्त केलं भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) बॉम्बेच्या अधिपत्याखाली घेतल्या जाणाऱ्या UCEED 2025 परीक्षेत अखिल भारतीय 49 वा क्रमांक मिळवून त्यांनी एक अत्यंत गौरवशाली यश संपादन केले आहे. 19 जानेवारी 2025 रोजी झालेल्या या परीक्षेचा निकाल 8 मार्च 2025 रोजी जाहीर झाला आणि त्यात मनोजने आपली मेहनत, समर्पण आणि कौशल्य सिद्ध केले. या प्रवासात त्याच्या कुटुंबाचा सहकार्याचा व मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे.

मनोजच्या आई-वडिलांनी व आजोबा आजी व काका यांनी त्याला शिक्षणासाठी आवश्यक असलेली प्रेरणा आणि पाठिंबा दिला. मेहनतीची शिकवण, चिकाटी आणि आत्मविश्वास



त्याला घरातूनच मिळाला. कुटुंबाने त्याच्या स्वप्नांना उंच भरारी घेण्यासाठी सतत साथ दिली, आर्थिक आणि मानसिक आधार दिला, त्यामुळेच आज तो यशाच्या या टप्प्यावर पोहोचू शकला. UCEED परीक्षेत इतका उच्च क्रमांक मिळवणे सोपे नाही. सातत्यपूर्ण सराव, उत्तम वेळेचे नियोजन आणि सखोल अभ्यास यामुळेच मनोजने हे यश मिळवले आहे. त्याचा हा प्रवास नवोदित डिझाइन विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल. UCEED सारख्या परीक्षांसाठी मुलांना खूप अभ्यास व सराव करावा लागते तो मनोजने अतिशय जिद्दीने प्रामाणिकपणाने विश्वासाने केला यामध्ये त्याचे वडील सुरेश राऊत काका गोपाल पाटील राऊत आजोबा हरिदास राऊत यांचा अतिशय मोलाचं मार्गदर्शन व सहकार्य लाभले घरातील सुसंस्कार व पारिवारित एकोपा यामुळे मनोजला त्याचं घवघवीत यश प्राप्त करता आलं

मनोजच्या यशासाठी BRDS Akola आणि या इन्स्टिट्यूट चे डॉ. एस.एन. शिंदे सर यांचे मनःपूर्वक आभार आणि अभिनंदन! केले आता मनोज समोर सर्वोत्तम IIT संस्थांमध्ये प्रवेश घेऊन डिझाइनच्या क्षेत्रात नवे तंत्रज्ञान आणि कल्पनाशक्ती वापरून स्वतःचे स्थान निर्माण करण्याची उत्तम संधी आहे. त्याच्या भविष्यासाठी भारतातील सहा महाविद्यालयांपैकी (भारतीय तंत्रज्ञान संस्था) आयआय टी प्रवेश निश्चित झाला असून BRDS कोचिंग इन्स्टिट्यूट अकोला येथे त्यांनी ट्युशन चे क्लास केले होते मनोज यांच्या यशामुळे अकोला व वाशिम जिल्ह्यामध्ये आणखी एक मानाचा तुरा पुरवल्या गेला असून मनोज यांच्या यशामुळे अकोला वाशिम जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उज्वल झाले आहे या यशाचे श्रेय तो आपले आई-वडील आजोबा काका व गुरुजनांना देत असून जिद्द चिकाटी प्रामाणिकपणा असला तर माणूस यश संपादन करू शकतो असे त्यांनी यावेळी सांगितले ग्रामीण भागातील मुलांनाही कुठेही मागे न राहता जिद्दीन चिकाटीने अभ्यास केला तर यशाच्या शिखरापर्यंत निश्चित स्वरूपाने आपण पोहोचू शकतो असे याप्रसंगी त्यांनी सांगितले मनोज वर चाहू बाजूने अभिनंदन चा वर्षाव होत असून त्याच्यापासून इतर विद्यार्थ्याने प्रेरणा घ्यावी असे इन्स्टिट्यूट चे डॉक्टर एस एन शिंदे यांनी सांगितले मनोज यांच्या यशामुळे भारतात वाशिम व अकोला जिल्ह्याचे नाव उज्वल झाले असून मनोज यांचा अनेक संस्थेतर्फे व महाविद्यालय असेल तर्फे सत्कार करण्यात येत आहे याप्रसंगी इंजिनीयर संतोष शेळके बापू आदमने डॉक्टर एपी राऊत सोनवणे सर गोपाल मोरे सर अभिजीत राऊत अविनाश चौधरी राहुल व सुरेश राऊत यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या

# "कामगारांचा 'राजू' ! आमदार असोत वा माजी, हक्काची 'पेटी' मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर!"

**आमदार राजूभाऊ तोडसाम हे नाव आज कामगारांच्या हक्कासाठी लढणाऱ्या एका कणखर नेतृत्वाचं प्रतीक बनलं आहे.**

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

२०१४ ते २०१९ या काळात आमदार म्हणून त्यांनी हजारो कामगारांना त्यांच्या हक्काची 'पेटी' मिळवून दिली. पण, विशेष बाब म्हणजे २०१९ ते २०२४ या काळात माजी आमदार असतानाही त्यांनी कामगारांसाठी आपला लढा थांबवला नाही.

**'पेटी' म्हणजे काय?**

'पेटी' म्हणजे कामाचा मोबदला. अनेकदा कामगारांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळत नाही. अशावेळी आमदार राजूभाऊ त्यांच्या मदतीला धावून जातात. त्यांनी अनेक कामगारांना कायदेशीर मार्गाने त्यांच्या हक्काची 'पेटी' मिळवून दिली आहे.

**आमदार राजूभाऊ तोडसाम : कामगारांच्या हक्कांचे समर्थक**

कामगार समुदायाप्रती असलेल्या अढळ समर्पणाचे उल्लेखनीय प्रदर्शन करताना, आमदार राजूभाऊ त्यांच्या योग्य मोबदल्यासाठी लढणाऱ्या कामगारांसाठी आशेचा किरण म्हणून उदयास आले आहेत.

कामगारांचा "राजू" म्हणून प्रेमाने ओळखले जाणारे, २०१४ ते २०१९ या काळात आमदार म्हणून त्यांचा कार्यकाळ 'पेटी' मिळवण्यात महत्त्वपूर्ण कामगिरीने भरलेला होता.

२०१९ मध्ये आपल्या अधिकृत पदावरून पायउतार होऊनही, कामगारांच्या हक्कांसाठी वकिली करण्याची राजूभाऊंची



वचनबद्धता कमी झालेली नाही. गेल्या पाच वर्षांत, त्यांनी अथकपणे आपला लढा सुरू ठेवला आहे, हजारो कामगारांना त्यांच्या पात्रतेचा मोबदला मिळावा याची खात्री करून घेतली आहे, बहुतेकदा कायदेशीर मार्गांनी.

राजूभाऊ जनतेशी थेट संपर्कात राहतात, कामगारांच्या वस्त्यांना नियमितपणे भेट देऊन त्यांच्या आव्हानांना समजून घेतात. त्यांच्या सक्रिय दृष्टिकोनात या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी प्रशासकीय संस्थांशी पाठपुरावा करणे समाविष्ट आहे.

त्यांची सामाजिक बांधिलकी त्यांच्या स्वतःच्या शब्दांतून स्पष्ट होते. कामगारांच्या हक्कांसाठी लढणे हे माझे कर्तव्य आहे.

जोपर्यंत माझ्यात ताकद आहे तोपर्यंत मी कामगारांसाठी लढत राहीन." या दृढ निष्ठेमुळे कामगार समुदायामध्ये विश्वास आणि कौतुकाची भावना निर्माण झाली आहे, अनेकांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. एका कामगाराने म्हटले, "आमदार राजूभाऊ आमच्यासाठी देवासारखे आहेत. त्याने आम्हाला आमच्या हक्कांचा 'पेटी' मिळवून दिला.

राजूभाऊंच्या प्रयत्नांमुळे निर्माण झालेले सकारात्मक वातावरण केवळ त्यांच्या वैयक्तिक कामगिरीवरच प्रकाश टाकत नाही तर समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण देखील आहे. कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न कामगार क्षेत्रात वकिली आणि प्रतिनिधित्वाचे महत्त्वाचे महत्त्व देखिल करतात. राजूभाऊ त्यांचे ध्येय पुढे चालू ठेवत असताना, समुदाय एकजूट होऊन उभा आहे, अशा भविष्याची आशा बाळगून आहे जिथे प्रत्येक कामगाराला त्यांची योग्य ओळख आणि मोबदला मिळेल.

## विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी सचिन खडताळे यांची निवड

**युवक आधार**
***निफाङ प्रतिनिधी राहुल कुलकर्णी***

महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 जयंतीच्या निमित्ताने निफाड येथे सार्वजनिक जयंती सोहळ्याच्या निमित्ताने बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते या बैठकीमध्ये समाज बांधव मोठ्या संख्येने







उपस्थित होते याप्रसंगी 134 जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेतृत्व सचिन खडताळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्षपदी हर्षल जगताप खजिनदारपदी विकास खडताळे सहखजिनदार सनी खडताळे कार्याध्यक्ष प्रथमेश खडताळे सरचिटणीस उज्वल खडताळे यांची निवड करण्यात आली जयंती उत्सव निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम राबवण्याचा मानस यावेळी सचिन खडताळे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी सुरेश खडताळे,सचिन निकाळे, प्रदीप खडताळे, सूर्यकांत खडताळे, प्रवीण खडताळे ,संतोष खडताळे, विलास खडताळे, प्रतीक पगारे,सागर खडताळे, अजय खडताळे,आकाश जगताप ,रोशन सोनवणे,रजनीकांत खडताळे साई शेळके,आकाश खडताळे, प्रतीक खडताळे,कुणाल खडताळे, अनुराग खडताळे, धनंजय साळवे, अनु साळवे,राहुल अहिरे, पंकज जगताप,स्वप्नील खडताळे, सुयश अहिरे,दुर्गेश भालेराव,दुर्गेश वाघ,लखन खडताळे,रोहन खडताळे,प्रीतम पगारे,अंतरीक्ष जगताप ,करण केदारे,ऋषिकेश निकाळे, प्रज्वल खडताळे, संकेत साळवे,दुर्गेश खडताळे, अर्जुन खडताळे,समर्थ सांगळे देवांशू खडताळे, नोमन शेख. आदी समाज बांधव उपस्थित होते.

द•ख•ल

## जामखेड आगारला नवीन बस मिळाव्यात : मागणी

**जामखेड:** आगार येथे जून्या बसेस मोडकळीस आलेल्या आहेत. यामुळे नागरिकांची हेळसांड होऊन हाल होत आहे. या विषयाकडे विभागीय कार्यालयाचे विभाग नियंत्रक यांनी लक्ष घालावे.एक महिन्यापूर्वी तारकपूर एस टी आगाराने जुने टायर टाकून खिळखिळ्या जुन्या ५ बसेस पाठवले आहे.व त्या देखील व्यवस्थित चालत



नाहीत,नवीन २० बसेस जामखेड आगार डेपो येथे देण्यात यावे. या मागणीसाठी भटके विमुक्त जाती, जमाती उत्तर महाराष्ट्र व मराठवाडा विभाग प्रमुख पांडुरंग माने यांनी जामखेड येथे दि. १२ मार्च रोजी जामखेड आगार प्रमुख यांना निवेदन दिले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका सरचिटणीस प्रकाश काळे, उमेश राळेभात, नितीन राऊत आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की,सध्या जामखेड आगार येथे १५ बसेस आहेत. त्यातील ५० बसेस चालू आहेत. २०१९ मध्ये जामखेड आगार कड़े ६७ बसेस कार्यरत होत्या. २०१९ पासून जामखेड आगार येथून बरेचसे मार्ग विस्कळीत झालेले आहेत. बस चा कालावधी १५ वर्षांपर्यंत महाराष्ट्र शासनाचा निर्णय असून ५० पैकी १० बसेस चा २-४ महिन्यात कालावधी संपत आहे. तरी आपण पाथर्डी आगाराला १० नवीन बसेस दिल्या त्याप्रमाणे जामखेड आगारास नवीन २० बसेस दि.०१ एप्रिल पर्यंत मिळाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे

## जागतिक स्तरावर होणाऱ्या आनंद सप्ताहाचे नगरमध्ये आयोजन

**अहिल्यानगर :** आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगरच्या वतीने जागतिक आनंद सप्ताह निमित्ताने निरोगी जीवनासाठी मंगळवार दि.१८ मार्च ते २३ मार्च दरम्यान श्री गजाजन हॉल, चौपाटी कारंजा, महाराष्ट्र बँकेच्या बाजूस बेसमेंट, दिल्लीगेट अहिल्यानगर येथे सकाळी ६ ते ९ वाजता योग-ध्यान, प्राणायम, सुदर्शन क्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबीरात शारीरिक, मानसिक तणावमुक्त, आरोग्यदायी जीवन या विषयावर मार्गदर्शन व योग-ध्यान, प्राणायम, प्रात्याक्षिके करुन घेण्यात येणार आहे. निरंतर सुदर्शन क्रिया अभ्यासाने अनेक लोक सुखी जीवन जगत आहेत. दैनंदिन जीवनात संघर्ष, ताण-तणाव, व्यसनमुक्तीसाठी आपणहून केलेले प्रयत्न, नैराश्य व चिंता या गोष्टी होत असतात. आर्ट ऑफ लिव्हींगच्या आनंद उत्सव या शिबीराद्वरे श्री श्री रविशंकरजी यांचे प्रेरणेने ठिकठिकाणी शिबीराचे आयोजन केले जाते. या शिबिर मध्ये आर्ट ऑफ लिव्हिंगचे आध्यात्मिक गुरू रविशंकरजी संबोधित करणार आहेत आणि दुःख तणावमुक्ति साठी वारंवार होणार्या शिबीरास चांगला प्रतिसाद देखील मिळातो. लोकांना याचे सकारात्मक ऊर्जा, लाभ मिळत आहे, योग आणि प्राणायम प्राचीन भारतीय पद्धती आहे, ज्याद्वरे शरीर, मन चांगले राहते आणि विचार करण्याची क्षमता, योग्य निर्णय घेण्यासाठी समर्थ बनविते. शारिरीक व मानसिक स्वास्थासाठी याचा अवलंब करावा, आपले शरीर सूक्ष्म प्राणशक्तींशी संबंधित असल्याने त्यांचा सराव नियमीत केल्या मानसिक शांती व आरोग्य चांगले राहते, सध्याच्या गतीमान जीवनशैलीमुळे आपले जीवन धकाधकींचे झालेले असून प्रत्येक स्तरावर ताण-तणाव, नैराश्य, चिंता या अश्या अनेक कारणांमुळे आपले आरोग्य बिघडत चालले आहे, निसर्गात होणार्या बदलामुळे आपले शरीरात वात, कफ, पित्त यामध्ये सुद्धा बदल होत असतात. प्रत्येकाला यशस्वी होण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, त्यामळे आनंदमयी आयुष्य जगायचे असेल तर आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावे लागेल. नियमीत सुर्यनमस्कार, व्यायाम केल्याने आपले शरीर व मनशांती ध्यानाद्वरे टिकून ठेवता येणे शक्य आहे. निरंतर योग साधना करण्यार्या माणसांची ऊर्जा चांगली राहते, असे आयोजकांकडून सांगण्यात आले. या शिबीरात जास्तीत जास्त अहिल्यानगरकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले.

# अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे ५२ कोटींचे अंदाजपत्रक सादर

## आरोग्य ,शिक्षण, कृषी, दिव्यांग वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी तरतूद



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे ५२ कोटी ५४ लाख ९० हजार ४२६ रुपयांचे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी अंदाजपत्रक जाहीर केले. यात जिल्हा परिषद शाळेत ओपन सायन्स पार्क उभारणी, मिशन आरंभ, सुरभि सुरक्षा अभियानासह ड्रोन फवारणी यंत्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र इमारतीवर सौर ऊर्जा प्रणाली स्थापित करणे यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. यावेळी मुख्य लेखा वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, दादाभाऊ गुंजाळ, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकूडझोडे, लेखाधिकारी योगेश आंबरे, महेश कावरे, डॉ बापुसाहेब नागरगोजे, मनोज ससे, भास्कर पाटील, अशोक कडुस, दशरथ दिघे, सहाय्यक लेखाधिकारी विजय बर्डे, भगवान निकम आदी उपस्थित होते. अंदाजपत्रकात जिल्हा परिषद शाळांमध्ये ओपल सायन्स पार्क विकसित करण्यासाठी ५० लाख रुपये, मिशन स्पार्क अंतर्गत थुंबा केरळ येथे विक्रम साराभाई स्पेस सेंटर, इसरो, आयआयएस, डीआरडीओ अशा संशोधन संस्थांमध्ये गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहली आयोजित करण्यासाठी २८ लाख ५० हजार रुपये, मिशन आरंभ अंतर्गत इयत्ता ३ री, ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्वतयारी पुस्तिका छापणे, इयत्ता ४ थी व ७ वी सराव परीक्षा घेणे तसेच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करणे व ऑनलाईन तासिकांसाठी ६ लाख रुपये, जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा फी भरणे, सराव परीक्षा घेणे व सराव प्रश्नसंच पुस्तिकांसाठी ३५ लाख रुपये, सुरभि सुरक्षा अभियानांतर्गत गायी म्हशीच्या पोटातील लोहजन्स वस्तूंपासून प्रतिबंध व उपायांकरिता साहित्य व उपकरणे पुरवणेसाठी १० लाख, ड्रोन फवारणी यंत्र देण्यासाठी ७० लाख रुपये, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना स्लरी फिल्टर उपकरण अनुदानावर देण्यासाठी १२ लाख ५० हजार रुपये, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र इमारतींवर सौर ऊर्जा प्रणाली स्थापित करण्यासाठी १० लाख रुपये, जिल्ह्यातील ग्रामीण रस्ते व दळणवळण सुविधेसाठी ३ कोटी ९५ लाख रुपये, जलधारा अंतर्गत जलसंधारण कामाची देखभाव व दुरुस्तीसाठी १ कोटी आदी तरतूदी अंदाजपत्रकात करण्यात आल्या आहेत. याशिवाय वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी तरतदू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना कडबाकुट्टी पुरविणेसाठी ५५ लाख रुपये, इयत्ता ५ वी ते १०वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सुमारे १हजार मुलींना मोफत सायकल देण्यासाठी ६० लाख रुपये, इयत्ता ५ वी ते १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे ६१६ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जेन्टस सायकल देण्यासाठी ३७ लाख रुपये, मागासवर्गीय शेतकऱ्यांना स्प्रे पंप खरेदीसाठी ५२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य, मागासवर्गीय शेतकऱ्यांना स्प्रिंकलर खरेदीसाठी ५५ लाख रुपये, मागासवर्गीय व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरणी घेण्यासाठी अर्थसहाय्य पुरविण्यासाठी ५० लाख रुपये, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरणी देण्यासाठी ३० लाख ३० हजार रुपये, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी झेरॉक्स मशीनसाठी ३० लाख ३० हजार रुपये, ग्रामीण भागातील महिलांना व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी ३३ लाख रुपये, ग्रामीण भागातील दिव्यांग महिला, बालकांना साहित्य पुरवण्यासाठी ३ लाख ६५ हजार रुपये, शेतकऱ्यांना स्लरी फिल्टर उपकरण अनुदानासाठी १२ लाख ५० हजार रुपये, पशुपालकांना दूध काढणी यंत्रांचा ६० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यासाठी २० लाख रुपये, पशुपालकांना मुक्त संचार गोठा उभारण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदानासाठी १५ लाख रुपयांची तरतदू करण्यात आली आहे

# पत्रकार संघाने महिलादिनी केला ३० महिलांचा सन्मान

**पारनेर :** राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई, पारनेर तालुका पत्रकार संघ, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार महासंघ पारनेर तालुका, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ, पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज यांच्या वतीने निघोज येथील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ३० महिलांचा सत्कार दि.८ मार्च ते दि.१३ मार्च रोजी महिला दिनानिमित्त झालेल्या सप्ताह कार्यक्रमात पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन महिलांना सन्मानित करण्यात आले. या मध्ये राजकीय व सामाजिक क्षेत्र ,सहकार क्षेत्र, महिला बचत गट, लॉन्ड्रीं व्यवसाय, हॉटेल व्यवसाय, पटेकरी व्यवसाय, गॅस व्यवसाय, ब्युटी पार्लर व्यवसाय, कापड व्यवसाय तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट कार्यालयात कार्यरत असणाऱ्या, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित प्रसादालयात कार्यरत अशा तीस महिलांचा सत्कार करुण त्यांना सन्मानित करण्यात आले.यामध्ये सरपंच चित्राताई सचिन वराळ पाटील, निघोज सोसायटीच्या माजी चेअरमन सविता बाबाजी तनपुरे, मळगंगा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनीताई सुनिल पवार, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रज्ञा निवृत्ती वाखारे, जिल्हा परिषदेच्या ज्येष्ठ शिक्षीका अनिता प्रकाश दिघे ( पाडळकर ) परिचारिका मंदा गायकवाड, भैरवनाथ महिला सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनंदा रामराव वरखडे, उपाध्यक्षा रागिणी बाबाजी वाघमारे, मॅनेजर व ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या रत्नमाला भगवान श्रीमंदीलकर, ग्रामपंचायत सदस्या भावना सतिष



साळवे, ग्रामपंचायत सदस्या शबनूर अस्लमभाई इनामदार, ग्रामपंचायत सदस्या रुपाली ठकाराम गायखे, व्यवसाय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वैशाली चंद्रकांत तेली, सुनिता बाळासाहेब जंगम, मिना राजेंद्र उनवणे, मंगल बाळासाहेब शेजवळ, तनिषा प्रकाश बांडे, सोनीताई सुनिल पवार, रुपा जयसिंग हरेल, चित्रा विलास हारदे, नंदा आप्पासाहेब वराळ पाटील, पूनम संदीप ईधाटे, फरजाना सलीम हवालदार, ज्येष्ठ मार्गदर्शिका साखराबाई भाऊ भुकन, अंगणवाडी मदतनीस संगीता बाळासाहेब लंके, शुभांगी संतोष लोखंडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट कार्यालयात कार्यरत असणाऱ्या मिना दशरथ साबळे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित प्रसादालयात कार्यरत असणाऱ्या ताराबाई बजरंग एरंडे, शोभा अशोक नरवडे, शोभा अर्जुन कांडेकर, मनिषा ज्ञानेश्वर वेताळ आदिंचा सन्मान करून सत्कार करण्यात आला. राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय शेरकर, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, माजी उपाध्यक्ष संतोषशेठ ईधाटे, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार महासंघाचे तालुकाध्यक्ष जयदीप कारखिले, कोषाध्यक्ष योगेश खाडे, पत्रकार आनंद भुकन, प्रेस फोटोग्राफर जयसिंग हरेल, पत्रकार सोमनाथ गोपाळे, पत्रकार सलीम हवालदार, पत्रकार संपत वैरागर, पत्रकार संदीप ईधाटे, पत्रकार रोहन उनवणे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ, सामाजिक कार्यकर्ते बाबाजी तनपुरे, रुपेश ढवण, अल्पसंख्याक समाजाचे युवा नेते नितेश जंगम, श्रद्धा ड्रायक्लीनर्स ॲन्ड लॉन्ड्रींचे मालक गणेश खाडे आदिंच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सरपंच चित्राताई वराळ पाटील यावेळी म्हणाल्या निघोज आणी परिसरात महिला दिन सप्ताह निमित्ताने निघोज व परिसरात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याचा मान पत्रकार संघाला पहिल्यांदाच मिळाला आहे. यापूर्वी कोनत्याही सामाजिक संघटनांनी महिलांचा सन्मान केला नाही हे काम पत्रकार संघाने करुण एक आदर्श सेवाभाव सुरु केला आहे याबद्दल महिला भगीनी यांच्या वतीने पत्रकार संघाला धन्यवाद व हार्दिक आभार. पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे यांनी सांगितले की ज्येष्ठ मार्गदर्शक दत्ताजी उनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व पत्रकारांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला सन्मान सप्ताह साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला यावर्षी फक्त तीस महिलांचा सत्कार करण्यात आला असला तरी पुढील वर्षी निघोज व परिसरातील शंभर पेक्षा जास्त महिलांचा सन्मान पत्रकार संघ यांच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती वाघमारे यांनी दिली आहे.

# होळी सण प्रेम आणि एकतेचा उत्सव; रेवदंडा पहिली मानाची होळी बहिरीगल्ली

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

होळीच्या सणामागील मुख्य आणि मानसिक उद्देश म्हणजे दृष्ट आणि वाईट प्रवृत्ती, वाईट विचार यांचा होळीच्या अग्नीमध्ये दहन करून चांगले विचार आणि चांगले वृत्ती अंगी बाळगावी अशी होळी समोर प्रार्थना केली जाते. होळीच्या दिवशी शिव्या देणे हा आपल्यातील वाईट प्रवृत्तींना बाहेर काढण्याचाच एक भाग मानला जातो. होळीचा सण हिवाळा संपल्याची आणि उन्हाळा सुरू झाल्याची जाणीव करून देतो. होळीच्या उत्सवांना रंगांचा सण, वसंत ऋतुचा सण आणि प्रेमाचा सण



म्हणूनही ओळखले जाते. होळीच्या आदल्या रात्री होलिका दहनाने होळीचा उत्सव सुरू होतो, जिथे लोक जमतात, आगीसमोर धार्मिक विधी करतात आणि प्रार्थना करतात की त्यांच्या अंतर्गत वाईट गोष्टींचा नाश व्हावा ज्या प्रकारे राक्षस राजा हिरण्यकशिपूची बहीण होलिका हिचा आगीत मृत्यू झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी रंगवाली होळी म्हणून साजरी केली जाते, जिथे लोक एकमेकांना रंग लावतात आणि भिजवतात. वॉटर गन आणि पाण्याने भरलेले फुगे हे सहसा एकमेकांना खेळण्यासाठी आणि रंगविण्यासाठी वापरले जातात, कोणासोबतही आणि कुठेही रंगासाठी योग्य खेळ मानले जाते. गट अनेकदा ड्रम आणि इतर वाद्य वाजवतात आणि गाणे आणि नृत्य करतात. दिवसभर लोक कुटुंबाला भेट देतात आणि मित्र आणि शत्रू एकत्र येऊन गप्पा मारतात, खाण्यापिण्याचा आनंद घेतात आणि होळीच्या स्वादिष्ट पदार्थांमध्ये भाग घेतात. कोकणप्रांतात होळीच्या निमित्ताने पुरुष स्त्रियांची सोंगे घेऊन कार्यक्रम करतात. "दशावतारी नाटक" हा कोकणातील एक अत्यंत प्रसिद्ध सांस्कृतिक प्रकार आहे. होळी रचण्याच्या विविध पध्दती आहेत. ठाणे - रायगड जिल्ह्यातील आगरी समाजात होळीचा आजोबा म्हणून होळी पासून काही अंतरावर एक नवीन झाड लावण्यात येते. जनतेला तरी ही पारंपरिक चालीरितीतून वृक्षसंवर्धन करण्याची ही सुंदर पध्दत वाटली व भावली ही.. होळीची रचना सर्व साधारणपणे एक खड्डा करून लाकडे उभी रचून, ती पेंढ्याने शाकारून सजविण्यात येते. होळी भोवती रांगोळ्या काढल्या जातात.

त्यानंतर होळीची पुजा करतात. होळी पेटविल्यावर स्त्रिया होळीला प्रदक्षिणा घालतात. यावेळी हातात तांब्या घेऊन त्यातून बारीक धार जमीनीवर पडेल याची काळजी घेतात. येथेही आग इतरत्र पसरू नये यासाठीची ही धार्मिक रिवाजावर आधारित योजना असावी असं वाटतं.स्त्रिया, पुरुष पेटत्या होळीत श्रीफळ अर्पण करतात. काही वेळाने ते अर्धवट भाजलेले श्रीफळ काढून ते प्रसाद म्हणून वाटून खातात. पेटत्या होळीतून नारळ बाहेर काढणं हा मावळ्यांचा आवडता खेळ होता. पर्यावरणपुरक होळी साजरी कराअवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळून अनेक प्रकारे नैसर्गिक आपत्ती निर्माण होण्याची शक्यता आहे. होळीत अनेक ठिकाणी गोवऱ्या, लाकडे जाळली जातात. या प्रकारामुळे प्रदूषणातही भर पडते. परिणामी, पर्यावरणालाही धोका पोहोचतो. धार्मिक महत्व असल्याने याबाबतही नागरिकांमध्ये प्रबोधन होण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध मंडळांनी एकत्र येऊन सार्वजनिकरित्या एकाच ठिकाणी होळी करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. या सणामध्ये कोणतीही वृक्षतोड करु नये तसेच कोणत्याही प्रकारे वन्यप्राण्याची शिकार करु नये. पर्यावरणपूरक होळी साजरी करावी, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.

# समानता हे इस्लामचे मुख्य सूत्र

समाजातील सर्व घटकांना समान संधी देऊन आपली प्रगती साधण्याची संधी इस्लाम ने जगाला उपलब्ध करुन दिली आहे. जगभरातील सर्व लोकांना समान कायदा निर्माण करुन समतेचे सूत्र इस्लाम धर्माने निर्माण केले आहे. रमजान महिन्यात सर्व मशिदी या भक्तांनी फुलून गेलेल्या असतात. गर्दीचा जणू महापूर आलेला असतो.पाच ही वेळची नमाज तसेच तरावीहच्या नमाजसाठी भक्तिभावाने सर्वांनी हजेरी लावलेली असते. नमाज ही अल्लाहसाठी आदा केली जाते.तशी प्रतिज्ञा (नियत) करुनच तिचा प्रारंभ होतो. एका रांगेत(सफ) एकमेकाला खेटून सर्वजण उभे राहतात. यावेळी कोण कोणाच्या शेजारी उभा राहील याचे बंधन नसते. बादशाहच्या शेजारी गुलाम,राजा शेजारी रंक,गोऱ्या शेजारी काळा असा कोणीही उभा राहू शकतो.तेथे कोणी उच्च किंवा कनिष्ठ नसतो. सर्वजण समान असतात. व्ही.आय.पी. दर्शन ही पध्दत तेथे नसते. नमाजची निश्चित केलेली वेळ झाल्यावर कुणाची ही वाट न पाहता प्रार्थनेला प्रारंभ होतो. मशिद हे अल्लाहचे घर असून तेथे सर्व समान आहेत.कोणताही भेदभाव तेथे केला जात नाही.खलिफा, बादशाह,सुलतान यांच्या काळात व आज ही जेथे




इस्लामी राजवट आहे अशा देशात बादशाह व त्याचे नोकर चाकर एकमेकांच्या शेजारी उभे राहून अल्लाहची प्रार्थना करतांना तसेच रोजा ईफ्तार करतांना एका ताटात बसलेले पहावयास मिळतात. समानता किंवा मसावात हे इस्लाम धर्माचे मुख्य सूत्र आहे. हजरत पैगंबरांनी त्यांच्या जीवनात जेव्हा हजच्या प्रसंगी शेवटचा खुत्बा (प्रवचन) दिला. त्यावेळी जाहीर केले कि,लोक हो,आज तुमच्यावर तुमचा धर्म मी पूर्ण केला आहे. माझ्यावर जी जबाबदारी अल्लाहने दिली होती ती सर्व मी,तुमच्या पर्यंत पोहोचविली आहे.तुम्ही सर्व समान आहात. कुणाचेही कुणावर वर्चस्व नाही.काळा, गोरा,अरबी व अरबेतर असा कोणताही भेद इस्लाम मध्ये नाही.तुम्ही सर्व एकमेकाचे भाई भाई आहात. इस्लामला जातीभेद मान्य नाही.पोटजाती हा प्रकार आपल्याकडे मुस्लिमांमध्ये व्यावसायावरुन पडला आहे. धर्म म्हणून इस्लाम व जात म्हणून मुस्लीम किंवा मुसलमान एवढी एकच जात मान्य आहे. शासनाच्या सवलतीसाठी जातीभेद हा इस्लाम मध्ये मान्य नाही. सर्वांनी एकदिलाने रहावे,आपल्यातील गरजूंना सर्वांनी मिळून मदत करावी व त्यांचा भार हलका करावा. कुणीही विकासापासून वंचित राहू नये.सर्वांना प्रगतीच्या समान संधी प्राप्त व्हावी ही इस्लाम धर्माची शिकवण आहे. रमजान महिन्यातील विविध उपक्रम हे या समानतेचाच एक भाग आहे.
(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

## स्त्री पुरुष समानता नव्हे, स्त्री पुरुषांनी माणूस असणे ही समानता..! उपजिल्हाधिकारी विजया पांगारकर

**दैनिक युवक आधार**
**बारामती प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**

**बारामती -** स्त्रीकडे स्त्री म्हणून नव्हे माणूस म्हणून बघा. स्त्री पुरूष समानता नव्हे, स्त्री पुरुषांनी माणूस असणे ही समानता असे सोलापूर जिल्हयाच्या उपजिल्हाधिकारी विजया पांगारकर म्हणाल्या. कोष्टी व्हिजन ट्रस्ट (केव्हीटी) बारामती शाखा आयोजित *महिला दिन विशेष कार्यक्रमात* प्रमुख पाहूण्या म्हणून पांगारकर बोलत होत्या. महिलांनी झोपेतून उठल्यानंतर आरशात स्वतःकडे बघून स्वतःलाच *'तू मला खूप आवडतेस'* म्हणावे. आपल्यातला राजहंस ओळखा. स्वतः केलेल्या कामाचे कौतूक म्हणून स्वतःचा हात मागे घेवून स्वतःलाच शाब्बास म्हणा. जेवढे तूम्ही कराल तेवढे तूम्ही गवसलात. तुमचे तूम्ही गवसलात की मग स्त्रीत्वाची भितीही नसते आणि तिचा गैरफायदा घेण्याची प्रवृत्ती सुध्दा नष्ट पावते. इथपर्यंत महिला आल्या तर कुठल्याही महिला दिनाची गरज नाही मग राहतो तो माणूस म्हणून निव्वळ सन्मान. मग या सन्मानाचा सोहळा आपण करायला लवकरच लावूया असे पांगारकर




यांनी महिलांना उदबोधित केले. आपली शक्ती आपणच जागृत करायची असते. समाजाच्या कार्यक्रमात प्रत्येक जण तो करेल, माझेवाचून समाजाचे काम अडणार आहे का? अशी भूमिका घेत गेला तर समाज संघटन होणार नाही. प्रत्येकजण समाजासाठी महत्वाचा आहे. थेंबाचे महत्व तळयालाच असते. स्वतःतले महत्व ओळखा. आपण समाजाला काय योगदान दिले हा प्रश्न स्वतःला विचारा. आपण पुढाकार घेतला तर समाज तुमचे मागे उभा राहतो. सामाजिक जबाबदारी कुणा एका व्यक्तीची नाही, सर्वांचे साथीने वज्रमुठ बनते असे या कार्यक्रमात *स्त्री शक्ती आणि संघटन* या विषयावर वक्त्या मंदाताई भागवत-टकले यांनी विचार व्यक्त केले. केव्हीटीचे सुरू असलेले विधायक उपक्रम, भविष्यातील वाटचाल, कोष्टी शक्तीपीठ निर्माण याबाबत केव्हीटीचे संस्थापक अड. सचिन देवांग यांनी प्रस्तावनेत माहीती दिली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष अड. सुधीर पाटसकर यांचा देखील या कार्यक्रमात विशेष सन्मान करण्यात आला. त्यावेळी त्यांनी केव्हीटीला भविष्यात सर्वोपरी सहकार्य राहील अशी भावना व्यक्त केली. स्वाती भंडारे व अड. सुषमा देवांग यांनी उपस्थित महिलांमधून प्रश्नावलीचे माध्यमातून उत्स्फुर्त विविध गुणदर्शन कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमाला महिलांनी मोठया संख्येने सहभाग घेवून बक्षिसे जिंकली व कार्यक्रमाचा आनंद घेतला. निफाड येथील श्री. गुलाबराव टकले, केव्हीटीचे खजिनदार अड. संदेश गुंडगे, श्री. अनिरूध्द शिळवणे आदी यावेळी उपस्थित होते. सुत्रसंचालन सौ. सुवर्णा भुजबळ व सौ. सुनिता पांडकर यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन केव्हीटी समन्वयक सौ. सिमा उनवणे, सौ. योगिता टकले, सौ. प्रिया शिळवणे, सौ. नम्रता वारे, सौ. सरिता व सौ. संध्या भंडारे यांनी केले. सौ. पौर्णिमा सरोदे यांनी आभार प्रदर्शन करून स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दखल

## नागरिकांनी ग्रामपंचायतीस कर भरून सहकार्य करावे : कवडे



**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे ग्रामपंचायतीस नागरिकांकडून देय असलेली सन २०२४/२५ साठीची करवसुली मोहीम सुरु करण्यात आली असून ग्रामस्थांनी ही ग्रामपंचायतीस देय असलेली घरपट्टी,पाणीपट्टी व इतर कर तात्काळ भरून सहकार्य करण्याचे आवाहन शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश डोके,विस्तार अधिकारी बी.आर.गावडे, ग्रामविकास अधिकारी स्वप्नील कवडे यांनी केले आहे.

दरवर्षी प्रमाणे जेष्ठ पत्रकार शेटे यांना ग्रामपंचायतीस देय असलेले कर त्यांचेकडून आज गुरुवार दि.१३ प्रथम भरून घेत ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात झाली.ग्रामपंचायत कर्मचारी,बबनराव शिंदे,विकास उघडे यांनी ग्रामपंचायतीतील आपापली कामे सांभाळून ग्रामपंचायतीस जास्तीत जास्त करवसुली होण्याकामी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. नागरिकांनी दिलेल्या करातूनच आरोग्य,दिवाबत्ती,स्वच्छता,पाणीपुरवठा,कर्मचारी व इतर विकासात्मक कामांवर खर्च होत असल्याने व नागरिकांनी ग्रामपंचायतीस दिलेल्या करातूनच अनेक स्थानिक कामे होत असतात त्यामुळे ग्रामपंचायतीस देय असलेले सन २०२४/२५ साठीचे कर तात्काळ भरून ग्रामपंचायतीस सहकार्य करण्याचे आवाहन ग्रामविकास अधिकारी कवडे यांनी केले आहे.

## संजयकुमार जोरी पुण्याच्या फुले विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी

**कवठे येमाई :** शिरूरच्या बेट भागातील मूळ जांबुत गावचे असणारे वरिष्ठ शिक्षक संजयकुमार विठोबा जोरी यांची नुकतीच पुणे येथील डी सी एम सोसायटी संचालित महात्मा ज्योतिबा फुले हायस्कुल आदमबाग व मुलींचे वसतीगृह सदाशिव पेठ पुणे या विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नुकतीच निवड झाली आहे.

संजयकुमार जोरी यांनी यापूर्वी त्यांच्या शिरूर तालुक्यातील जांबुत येथील जय मल्हार हायस्कुल विद्यालयात उपशिक्षक तसेच शिष्यवृती परिक्षा तज्ञ इंग्रजी विषयाचे शिक्षक,महर्षी शिंदे हायस्कुल आंबळे ता. शिरूर, जि. पुणे प्रशालेचे 'मुख्याध्यापक म्हणून उत्कृष्ट काम केले आहे.

## गांजा विकणाऱ्या दोघांना अटक, १६ लाखांचा गांजा जप्त

**पुणे :** मुंढवा भागात गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडून १६ लाख ८० हजारांचा २८ किलो गांजा जप्त करण्यात आला. प्रमोद सुधाकर कांबळे (वय ४४, रा. किल्ला वेस, करमाळा, जि. सोलापूर), विशाल दत्ता पारखे (वय ४१, रा. मोहननगर,आदित्य सोसायटी, विश्रांतवाडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मुंढवा परिसरात अमली पदार्थ विरोधी पथक गस्त घालत होते. त्या वेळी कांबळे आणि पारखे गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी आझाद पाटील यांना मिळाली. पोलिसांनी सापाळा लावून कांबळे आणि पारखे यांना पकडले. त्यांच्याकडे असलेल्या पिशवीची तपासणी करण्यात अली. त्यांच्याकडून १६ लाख ८० हजारांचा २८ किलो गांजा जप्त करण्यात आला.

## रात्रीतून सातबारा उताऱ्यावरची नावे गायब

**बारामती :** येथे म्हाडाच्या प्लॉटधारकांच्या जागेवर आयुर्वेदिक महाविद्यालय उभारून म्हाडाच्या प्लॉटधारकांना पाच किलोमीटरच्या हद्दीत पर्यायी जागा न दिल्याने म्हाडा प्लॉटधारकांनी बुधवारपासून उपोषणाला सुरुवात केली. यातील उपोषणकर्ते आनंद धोंगडे यांनी दिलेल्या माहितीनुसार एका रात्रीत सात बारा उतारावरची नावे गायब झाली, शासकीय अधिकाऱ्यांनी प्लॉटधारकांना विचारात न घेता त्या जागेवर आयुर्वेदिक महाविद्यालय उभारले आहे. आम्हाला बारामती शहरापासून पाच किलोमीटरच्या आत पर्यायी जागा मिळावी, अशी मागणी आम्ही केली आहे, मात्र प्रत्यक्षात बारामतीपासून गोजूबावी गावानजीक माळरानावरची पर्यायी जागा म्हणून आम्हाला देऊ केली आहे. बारामती शहरातील मेडद हद्दीतील म्हाडाच्या प्लॉटधारकांची जागा शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाला घेऊन आता त्या जागेऐवजी गोजूबावी येथील माळरानावरील जमीन पर्यायी म्हणून दिली जात आहे, हे आम्हाला मान्य नाही, म्हाडा प्लॉटधारकावरील हा अन्याय असून आम्ही याबाबत न्यायालयीन लढाई लढणार आहोत, अशी माहितीसुद्धा आंदोलनकरते आनंद धोंगडे यांनी दिली.

# शिवनेरी, शिवशाही मोडीत:आज होणार लिलाव

**पुणे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) आयुर्मान संपलेल्या आणि नादुरूस्त अशा ७२ 'शिवशाही' आणि 'शिवनेरी' बस मोडीत काढण्याचा निर्णय पुणे 'एसटी' विभागाने घेतला आहे. शुक्रवारी (२१ मार्च) रोजी या बसचा लिलाव करण्यात येणार असून केंद्र सरकारच्या मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन (एमएसटीसी) मधील एजन्सीमार्फत या नादुरूस्त बससाठी बोली लावण्यात येणार आहे. नादुरूस्त बसच्या माध्यमातून अडीच ते तीन कोटी रुपये प्राप्त होण्याचा अंदाज 'एसटी' महामंडळाकडून व्यक्त करण्यात आला आहे. स्वारगेट बस स्थानकात तरुणीवर बलात्काराच्या घटनेनंतर सुरक्षात्मक यंत्रणेचा अभाव समोर आला. त्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील सर्व बस स्थानकातील आयुर्मान संपलेल्या आणि नादुरूस्त बस १५ एप्रिलपर्यंत मोडीत काढण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुणे विभागीय कार्यालयाच्या परिसरात 'एसटी' महामंडळाच्या ७२ 'शिवशाही' आणि 'शिवनेरी' बस गेल्या वर्षभरापासून अडगळीत पडून आहेत. याबसमुळे मोठ्या प्रमाणात जागा व्यापली असून बसमधील साहित्याची चोरीसारख्या घटना घडल्या आहेत. दरम्यान, नादुरूस्त बसचा गैरवापर होत असल्याचेही निदर्शनास आले आहे. 'एसटी' महामंडळाच्या ताफ्यात नव्याने बस येत असून आत्तापर्यंत ३० पर्यावरणपूरक 'शिवाई' बस दाखल झाल्या आहेत. त्यामुळे तातडीने २१ मार्चला आयुर्मान संपलेल्या ७२ बस लिलाव प्रक्रियेदरे मोडीत काढण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती 'एसटी' महामंडळाकडून देण्यात आली. केंद्र सरकारच्या धोरणानुसार मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन (एमएसटीसी) हे अधिकृत संकेतस्थळ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर जाऊन बसची माहिती आणि संख्येची माहिती स्पष्ट करून निविदा भरण्यात येते. त्यानंतर शासनाने निवडलेल्याच अधिकृत एजन्सी किंवा खरेदीदारांना लिलावामध्ये समाविष्ट करून घेतले जाते. लिलाव करताना या बसमधील सुट्टे भाग म्हणजे आसन, लोखंड, इंजिन, ऑईल, पत्रा, चाक, इलेक्ट्रीक साहित्य आदींची बोली लावली जाते, किंवा आहे त्या अवस्थेतील बससाठी बोली लालवी जाते. त्यानुसार सर्वाधिक बोली लावणाऱ्या खरेदीदाराला बस दिली जाते. ठराविक मुदतीनुसार संबंधित बस घेऊन जात त्या मोडीत काढल्या जातात.

### एसटी'तून साडेआठ कोटीं रुपये प्राप्त

आयुर्मान संपलेल्या बस मोडीत काढण्याची नियमीत चालणारी प्रक्रिया आहे. गेल्या (२०२४) वर्षी एसटी' महामंडळाच्या १४ आगारातील आयुर्मान संपलेल्या २४० बस मोडीत काढल्या होत्या. त्या बसच्या माध्यमातून एसटी महामंडळाला ८.५ कोटी रुपये प्राप्त झाले होते.

# महामार्गावरील दोन हजार अतिक्रमणे जमीनदोस्त

**पुणे :** शहर आणि परिसरातील राष्ट्रीय आणि राज्य मार्गांवरील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) धडक मोहीम राबविण्यात येत असून गेल्या नऊ दिवसांत सुमारे दोन हजार अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. या कारवाईत दोन लाख चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्र मोकळे करण्यात आल्याने रस्त्यांनीही मोकळा श्वास घेतला आहे. शहर आणि परिसरात काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामांचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत असून नागरिकांसह वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे महामार्ग कोंडीमुक्त करण्याच्या दृष्टीने पीएमआरडीएसह राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांनी संयुक्त मोहीम हाती घेतली आहे. या कारवाईत गेल्या नऊ दिवसांत १ हजार ९९२ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. यात एक लाख ९९ हजार दोनशे चौरस मीटरवरील अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. यात प्रामुख्याने वर्दळ असणाऱ्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे काढण्यावर भर देण्यात येत

# शिराळ्यात पाण्याचा टँकर सुरू

## पूर्व आंबेगावात पाणीबाणी परिस्थिती

**लोणी धामणी :** मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शिरदाळे गावाला पाण्याची भीषण टंचाई भासू लागली आहे. पावसाळ्यात कमी झालेल्या पावसाचे परिणाम हे फेब्रुवारी पासून जाणवु लागले होते. शिरदाळे ( ता. आंबेगाव ) गावाला दुषित पाण्यामुळे पाण्याची गैरसोय झाली होती. शिरदाळे ग्रामस्थांनी टँकर सुरू करण्याबाबत आमदार दिलीप वळसे पाटील यांना निवेदन दिले व पंचायत समिती आंबेगाव यांना प्रस्ताव पाठवला होता. आमदार वळसे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना टँकर सुरू करण्याबाबत सूचना दिल्या होत्या तळ्यातील पाणीसाठा खराब असल्याने त्याचा वापर करणे धोक्याचे झाले होते.नागरिकांचे आजाराचे प्रमाण वाढत चालले होते. नव्याने सुरू झालेल्या टँकरचे पाणी सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या विहीरीत टाकण्यात आले असुन त्यातुनच सर्वांना पाणी पुरवठा होणार असल्याचे सरपंच सुप्रिया तांबे यांनी सांगितले. टँकर सुरू झाल्याने रोजच्या वापरासाठी मिळणारे पाणी तरी चांगले मिळेल अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. यावेळी मा.सरपंच श्री.मनोज तांबे,उपसरपंच श्री.बीपीन चौधरी,मा. उपसरपंच श्री.बाळासाहेब रणपिसे,प्रभाकर तांबे,विक्रम तांबे,बाळासाहेब तांबे हे उपस्थित होते.

# महिला बचतगट उत्पादित वस्तूंचे जिल्हास्तरीय प्रदर्शन आजपासून


**बारामती :** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) पुणे व बारामती नगरपरिषद बारामती यांच्या सयुंक्त विद्यमाने १४ ते १६ मार्च या कालावधीत शारदा प्रांगण, बारामती येथे महिला बचतगट उत्पादित वस्तूंचे जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री करिता भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. (दि:१४) रोजी राज्यसभा खासदार, सुनेत्रावहिनी पवार यांच्या शुभहस्ते भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर हे प्रमुख उपस्थित म्हणून राहणार आहेत. ग्रामीण व शहरी बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तु व खाद्य पदार्थ यांना स्थानिक बाजारपेठ व उद्योजकीय संधी उपलब्ध व्हावी व बचत गटातील महिलांच्या आर्थिक प्रगतीसाठी मदत व्हावी या साठी सदर जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री करिता भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ मार्च २०२५ रोजी (दुपारी ४.००) वाजता भव्य प्रदर्शनाचे



उद्घाटन करण्यात येणार असून १४ मार्च ते १६ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ९:३० वाजेपर्यंत प्रदर्शन व विक्री सर्वांसाठी खुले राहणार आहे.प्रदर्शनाच्या उद्घाटन नंतर १४ मार्च पासून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आले आहेत. (दि:१५) रोजी खेळ पैठणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५ ते ९ या कालावधीत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती महिला आर्थिक विकास महामंडळ ( माविम) पुणे यांनी दिली.

# राज्य सरकारकडून प्रथमच जन्मगावी श्रीमंत मल्हारराव होळकर जयंती महोत्सव सोहळा

**बारामती :** राष्ट्रपुरुष श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांचा ३३२ वा जयंती महोत्सव रविवार (दि.१६) मार्च २०२५ रोजी (सकाळी १०:३० वा.) जन्मगाव मुरूम (ता. फलटण जि. सातारा) या ठिकाणी होणार आहे. हा कार्यक्रम सातारा जिल्हा परिषद,फलटण पंचायत समिती व मुरूम ग्रामपंचायत महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहमध्ये व थाटामाटात होणार आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री शंभूराज देसाई, युवक व क्रीडामंत्री दत्तामामा भरणे, बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर, माजी खासदार रणजीत निंबाळकर, आमदार गोपीचंद पडळकर,फलटण विधानसभेचे आमदार सचिन पाटील कांबळे उपस्थितीत राहणार आहेत. श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर हे अटकेपार झेंडे फडकवणारे व होळकरशाहीचे मुख्य आधारस्तंभ राहिले असून



इतर प्रमुख महापुरुषाएवढेच त्यांचं राष्ट्रनिर्माणासाठी महान कार्य राहिले असून याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन यावर्षीपासून मोठ्या प्रमाणात जयंती करण्याचे सरकारने ठरवले आहे. या कार्यक्रमासाठी खासदार उदयनराजे भोसले, खासदार धर्यशील मोहितेपाटील, मा.महादेव जानकर, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख,आमदार उत्तमराव जानकर,आमदार नारायण पाटील, होळकर घराण्याचे वंशज भूषणराजे होळकर,ॲड.रामहरी रुपनवर, संजूबाबाराजे निंबाळकर, अमरजीत बारगळ, दीपक चव्हाण, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषद मुख्याधिकारी याशिनी नागराजन,पोलीस अधीक्षक समीर शेख आदी मान्यवर उपस्थित राहणार

# पुण्यात वेगवेगळ्या अपघातात तिघे ठार

**पुणे :** शहरात वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. पुणे-नगर रस्ता, तसेच औंध भागातील ब्रेमेन चौकात अपघाताच्या घटना घडल्या.

पुणे-नगर रस्त्यावर विमाननगर परिसरात खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (११ मार्च) रात्री दहाच्या सुमारास घडली. अपघातानंतर पसार झालेल्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रणव प्रवीण औचर (वय २३) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. याबाबत निलेश प्रल्हाद ढसाळ (वय ४५, रा. साई सत्यम पार्क, वाघोली) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार प्रवीण हा मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास नगर रस्त्याने निघाला होता. विमाननगर परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसने दुचाकीस्वार प्रवीणला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या प्रवीणचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला होता. अपघातानंतर पसार झालेल्या बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक चेतन भोसले तपास करत आहेत.

# बुलेट सायलेन्सरवर वाहतूक पोलिसांकडून 'बुलडोझर'

### विक्रेते, गॅरेजचालकांविरुद्ध कारवाई

कर्कश सायलेन्सरचा वापर करणारे वाहनचालक, तसेच सायलेन्सर विक्री करणारे व्यावसायिक, तसेच सायलेन्सर बसवून देणारे गॅरेजचालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. यापुढील काळात ही कारवाई तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिला आहे.

**पुणे :** फटाक्यांसारखा आवाज काढणारे कर्कश सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यासारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या कार्यालयात जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला. पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतूक केले आहे. रात्री अपरात्री शहर,तसेच उपनगरात भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. बूलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करण्यात आल्याने त्यातून फटाक्यासारखा आवाज निघतो. फटाक्यासारख्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसंनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते. कर्कश सायलेन्सर नष्ट करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले होते. त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर 'बुलडोझर' चालवून नष्ट केले.



या वेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पोलीस निरीक्षक सुनील गवळी आणि वाहतूक शाखेतील अधिकारी उपस्थित होते.

फटाक्यासारखा आवाज काढणारे, तसेच चित्रविचित्र आवाज काढणारे सायलेन्सर बसविल्यास पोलिसांकडून जप्त करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या सायलेन्सरचा वापर करणाऱ्या दुचाकीस्वार, बुलेटचालकांविरुद्ध यापुढील काळात तीव्र कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस उपायुक्त अमोल झेडे

# 'भीमाशंकर' भंगाराच्या भावात विकतेय ॲल्युमिनियम : देवदत्त निकम यांचा आरोप

**वळती :** पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यात असणाऱ्या भीमाशंकर साखर कारखान्यात नोंदणी असणारा ऊस पराग या खासगी साखर कारखान्याला देण्याचा विचित्र ठराव भीमाशंकर साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाने केला असल्याचा आरोप भीमाशंकरचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक देवदत्त निकम यांनी पत्रकार परिषद घेत या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. त्याच बरोबर भीमाशंकर कारखान्याकडून विक्री करण्यात येत असलेल्या भंगारामध्येही मोठा गैरव्यवहार होत असून लोखंडाच्या भावात ॲल्युमिनियम विकले जात असल्याचा आरोप देवदत्त निकम यांनी पारगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील संस्थापक असलेल्या भीमाशंकर सहकारी साखर कारखाना सुरू असून पराग हा खासगी साखर कारखाना माजी मंत्री वळसे पाटील यांच्या जवळच्या नातेवाईकाचा असल्याने भीमाशंकरचा ऊस परागला देत असल्याच्या निकम यांच्या आरोपाने खळबळ उडाली आहे. वळसे पाटलांच्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याकडे नोंद असलेला ऊस पराग खासगी कारखान्याला देण्याचा भीमाशंकरचा ठराव संचालक मंडळानी केला आहे, असे निकम बोलले. भीमाशंकर कारखान्याचे स्क्रॅप विक्री मध्ये मोठा घोटाळा असून लोखंडाच्या भावात ॲल्युमिनियम विकले जात असल्याच गंभीर आरोप भीमाशंकर कारखान्याचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक देवदत्त निकम यांचा पत्रकार परिषदेत केला आहे.





# तारीख पे तारीख... इच्छुकांचे चेहरे बारीक

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक पुढे गेल्याने इच्छुक उमेदवार नाराज

### खर्च करून इच्छुक थकले

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. विविध कार्यक्रम, देव दर्शन यात्रांचे नियोजन करण्यात आले आहे. यापूर्वी देखील अनेकदा निवडणुका लागणार आहेत या माहितीनुसार इच्छुकांनी तयारी सुरू केली होती. मात्र, निवडणुका वारंवार काही कारणास्तव लांबणीवर गेल्याने अनेकांचा हिरमोड झाला. त्यात आता पुन्हा एकदा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची चर्चा रंगू लागल्याने इच्छुकांनी तयारी करायला सुरुवात केलीय. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांबाबत निर्णय काहीही होवो, पण आपली निवडणुकीची तयारी जोरात सुरू ठेवावी लागत असल्याने इच्छुक उमेदवार वैतागले आहेत.

### मोर्चेबांधणीतून कार्यकर्त्यांना बळ

विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. भाजप, काँग्रेससह तमाम राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरु केलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे भविष्य असणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. तसेच, राजकीय पक्षांनीही मोर्चेबांधणी सुरू केली असून पक्षाचे मेळावे व बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना बळ दिलं जात आहे.

**पाबळ :** मिनी विधानसभा समजल्या जाणा-या व मागील तीन चार वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांमुळे प्रलंबित असलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अजून उशीर होणार असून त्यामुळे दुस-या फळीतील इच्छुक उमेदवार, कार्यकर्ते नाराज झाले आहेत. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात संबंधात होणारी सुनावणी ६ मेपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यावेळी न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला तरी संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्षात आणायला किमान तीन महिन्यांचा अवधी लागणार आहे. त्यामुळे या निवडणुका पावसाळ्यानंतर, दसरा दिवाळी दरम्यान होतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या प्रकरणात महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांच्या संख्येची निश्चिती, प्रभाग रचना, सदस्य संख्या निवडणूक आयोगाने करायची की राज्य सरकारने, ओबीसी आरक्षण अशा मुद्यांवर सर्वोच्च न्यायालय निकाल देणार आहे. ६ मे च्या सुनावणीत निवडणूक घेण्याचा आदेश सर्वोच्च



न्यायालयाने दिल्यास, पावसाचा उमेदवार, मतदार, कार्यकर्ते, निवडणूक प्रक्रियेतील सरकारी आधिकारी, कर्मचारी या सर्वांनाच त्रास होऊ शकतो. जूनच्या पहिल्या आठवड्यात मॉन्सून सुरू होतो. पावसाळ्यात पडणाऱ्या जोरदार पावसामुळे निवडणूक घेणे शक्य, नाही. गौरी गणपती आटोपल्यानंतर पितृपंधरवडा येतो. त्यानंतरच या निवडणुका होण्याची शक्यता आहे.